# गृहिणी

## आरोग्य

### पावसाळा आणि आरोग्य

पावसाळा हा ऋतू निसर्गाला नवीन जीवन देणारा असला, तरी या दिवसांत हवेतील आर्द्रतेमुळे विविध आजार पसरण्याचा धोका वाढतो. त्यामुळे पावसाळ्यात आरोग्याची विशेष काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. या ऋतूत दूषित पाण्यामुळे टायफॉइड, कावीळ आणि गॅस्ट्रो यांसारखे जलजन्य आजार होऊ शकतात, म्हणून नेहमी उकळलेले आणि गाळून घेतलेले पाणीच पिले पाहिजे. तसेच, बाहेरचे उघड्यावरचे किंवा स्ट्रीट फूड खाणे पूर्णपणे टाळून घरचे ताजे आणि गरम अन्न खाण्याला प्राधान्य द्यावे. रोगप्रतिकारक शक्ती मजबूत ठेवण्यासाठी आल्याचा चहा, तुळशीचा काढा किंवा हळद घातलेले कोमट दूध नियमितपणे प्यावे. पावसाळ्यात पालेभाज्यांमध्ये जंतू असण्याची शक्यता जास्त असते, त्यामुळे भाज्या नेहमी मीठाच्या किंवा कोमट पाण्यात स्वच्छ धुवून मगच शिजवाव्यात. सततच्या पावसामुळे किंवा ओल्या वातावरणामुळे सर्दी, खोकला, अंगदुखी आणि व्हायरल इन्फेक्शनचा त्रास होऊ शकतो, यापासून वाचण्यासाठी स्वतःला कोरडे ठेवावे. पावसात भिजल्यास घरी आल्यावर त्वरित कोरडे कपडे घालावेत आणि पाय स्वच्छ धुवून पूर्णपणे कोरडे करावेत, जेणेकरून फंगल इन्फेक्शनचा धोका टळेल. घराभोवती किंवा गच्चीवर पाण्याची भांडी, टायर किंवा कचऱ्यामध्ये पाणी साचू देऊ नका, कारण साचलेल्या पाण्यात डास होऊन डेंग्यू आणि मलेरिया पसरू शकतात. आहारात व्हिटॅमिन सी युक्त लिंबू, संत्री यांसारख्या फळांचा समावेश केल्याने शरीराची रोगांशी लढण्याची क्षमता वाढते. वैयक्तिक स्वच्छतेची काळजी घेत हात वारंवार साबणाने धुवावेत आणि शक्यतो बाहेरचे थंड पिणे टाळावे. आरोग्याविषयी कोणतीही छोटी-मोठी लक्षणे जसे की ताप किंवा पोटदुखी जाणवल्यास घरगुती उपचार करण्याऐवजी तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

## पाककला

### खमंग दही पोहे

**साहित्य :** पोहे २ कप (पाण्यात धुवून व निथळून घेतलेले), दही १ कप (घट्ट आणि थोडे गोडसर), हिरव्या मिरच्या २-३ (बारीक चिरलेल्या), कोथिंबीर बारीक चिरलेली अर्धी वाटी, जिरे १ चमचा, मोहरी अर्धा चमचा, हिंग चिमूटभर, कढीपत्ता ८-१० पाने, साखर १ ते २ चमचे (आवडीनुसार), मीठ चवीनुसार, तेल किंवा तूप २ चमचे, डाळिंबाचे दाणे किंवा शेव (आवडत असल्यास गार्निशिंगसाठी)

**कृती :** प्रथम पोहे स्वच्छ धुवून एका चाळणीत किंवा बाऊलमध्ये निथळण्यासाठी ठेवा, जेणेकरून ते मऊ आणि सुटसुटीत होतात. आता एका बाऊलमध्ये निथळलेले पोहे घ्या, त्यात गोडसर फेटलेले दही, चवीनुसार मीठ आणि साखर घालून चांगले एकत्र करून घ्या. एका छोट्या कढईत किंवा तडका पॅनमध्ये तेल किंवा तूप गरम करा. तेल गरम झाल्यावर त्यात मोहरी आणि जिरे तडतडू द्या. त्यानंतर त्यात हिंग, कढीपत्ता आणि बारीक चिरलेल्या हिरव्या मिरच्या घालून खमंग फोडणी तयार करा. तयार केलेली ही फोडणी दही-पोह्यांच्या मिश्रणावर ओता आणि वरून बारीक चिरलेली कोथिंबीर घाला. सर्व साहित्य हलक्या हाताने व्यवस्थित मिक्स करा. वरून डाळिंबाचे दाणे किंवा शेव घालून खमंग दही पोहे सर्व्ह करा.

## वास्तू

### वॉलपेंटींग्स असे असावेत

✻ बेडरूममध्ये शांतता देणारे आणि रोमँटिक किंवा आनंदी विषय असावेत. जसे की, दोन प्रेमात असलेले हंस, जोडीदाराचे आनंदी चित्र किंवा शांत निसर्गाचे दृश्य.

✻ बेडरूममध्ये हिंसक प्राणी, युद्ध, एकटेपणा दर्शवणारे उदास चित्र किंवा पाण्याचा प्रवाह (धबधबा) असलेली चित्रे कधीही लावू नयेत. यामुळे नात्यात दुरावा किंवा मानसिक तणाव वाढू शकतो.

## सौंदर्य

सकाळी उठल्यानंतर चेहऱ्याची त्वचा स्वच्छ करण्यासाठी कापसाच्या बोळ्यानं चेहऱ्याला कच्चे दूध लावावे. यामुळे चेहऱ्यावरील धूळ आणि मळ निघून जातो.

## सल्ला

साबुदाण्यामध्ये भिजवतानाच शेंगदाण्याचा कूट आणि मीठ व्यवस्थित मिसळून ठेवा. शेंगदाण्यामुळे जास्तीचे पाणी शोषले जाते आणि खिचडी मोकळी होते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६

**कामिका एकादशी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आषाढ कृष्णपक्ष, मृग १४।४४, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. १० मि.**

### राशिभविष्य

**मेष :** दिवस संमिश्र. मुलांच्या यशामुळे आनंद.

**वृषभ :** प्रगतीची नवी दारे उघडतील. घाईघाईत शब्द देणे टाळा.

**मिथुन :** कष्टाचे फळ मिळेल. गुंतवणूक विचारपूर्वक करा.

**कर्क :** संपत्ती खरेदीसाठी अनुकूल काळ. ज्येष्ठांच्या प्रकृतीची काळजी घ्या.

**सिंह :** आर्थिक स्थिती मजबूत होईल. कुटुंबियांचे सहकार्य लाभेल.

**कन्या :** सकारात्मक ऊर्जा राहील. धार्मिक कार्यात मन रमेल.

**तुळ :** निर्णय विचारपूर्वक घ्या. आर्थिक नियोजन चोख ठेवा.

**वृश्चिक :** अचानक धनलाभ होईल. वाहन हळू चालवा.


**धनु :** दिवस आनंदात जाईल. मान-सन्मान वाढेल.

**मकर :** आर्थिक व्यवहार सांभाळून करा. खर्चावर नियंत्रण ठेवा.

**कुंभ :** आत्मविश्वासाने यश मिळेल. नवीन कामाची सुरुवात करा.

**मीन :** जुन्या कष्टाचे गोड फळ मिळेल. मन प्रसन्न राहील.


## शब्दगंध क्र. ७४९१ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) लग्नात नवरदेवाला आणायला जाणारा वधूचा भाऊ किंवा अन्य व्यक्ती ५) मत्सर; द्वेष; हेवा ७) बारीकसारीक; किरकोळ ९) पापी लोक मृत्यूनंतर येथे जातात असे म्हटले जाते १०) पसरलेले; विस्तृत १३) पडणे; नाश; पतन १५) ओझे; पेंढी १६) आंब्याची एक जात १८) एक श्वासरोग १९) सत्त्व; परीक्षा; चाचणी २१) अतिशय गरम (खाण्याचे पदार्थ किंवा तव्यावरून काढलेली पोळी वगैरे) २४) सर्व; सकल; सारे २५) कागदावर किंवा वाळूवर रेघा मारून शकुन पाहण्याची विद्या

**उभे शब्द :-** १) कपडा; वस्त्र; कापड २) भात शिजताना होणारा आवाज ३) धारण करणारा ४) पाण्याचे वायुरूप ५) पांढरे चकचकीत; संगमरवरी ६) मिळून; बरोबर; सहवर्तमान; धरून ८) मोठी गोटी; वरचा भाग; आच्छादन ११) पूर्वीच्या काळातील अर्ध्या शेराचे वजन १२) स्त्रियांचे एक वस्त्र १४) अनुमान; अंदाज; तर्क; कयास १७) एक प्रकारचे अतिशय तलम सुती कापड २०) पूर्ण भरतीची वेळ २१) संरक्षणासाठी रात्री केला जाणारा फिरता पहारा २२) फळातील रसाळ भाग; मगज २३) एक प्रकारची दारू

### शब्दगंध क्र. ७४९० चे उत्तर



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार :** सुखापेक्षा समाधान महत्त्वाचे आहे, कारण सुख थोडा काळ टिकते पण समाधान आयुष्यभर पुरते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### झाडे एकमेकांशी संवाद साधतात का?

जमिनीखाली झाडांच्या मुळांशी बुरशीचे सूक्ष्म धागे पसरलेले असतात. या जैविक इंटरनेटद्वारे झाडे एकमेकांना पाणी, अन्न आणि खनिजे पाठवतात. एखादे झाड संकटात आल्यास, याच जाळ्याद्वारे शेजारच्या झाडांना रासायनिक संदेश पाठवून सावध केले जाते, ज्यामुळे इतर झाडे स्वतःच्या रक्षणासाठी आधीच तयार होतात. जेव्हा एखादे झाड कीटकांच्या हल्लयामुळे संकटात असते, तेव्हा ते हवेत काही विशिष्ट रासायनिक वायू सोडतात. हा गंध वाऱ्यासोबत दूरवर पसरतो आणि आजूबाजूच्या झाडांना धोक्याची पूर्वसूचना देतो, परिणामी ती झाडे स्वतःची पाने चवीला कडू करून रक्षण करतात. थोडक्यात, जंगलातील जुनी आणि मोठी झाडे (मातृवृक्ष) या इंटरनेट व गंधाच्या माध्यमातून लहान रोपांचे संगोपन करतात आणि एकसंधपणे एकत्र जगतात.

### मुक्या जिवांची हाक


एका सुंदर उपनगरात माधवराव नावाचे सज्जन राहत होते. त्यांच्या घरासमोर एक डेरेदार पिंपळाचे झाड होते. त्या झाडावर अनेक पक्षांनी आपली घरटी बांधली होती आणि उन्हाळ्यात सावलीसाठी वाटसरू तिथे बसायचे. एकदा त्या भागात एक बिल्डर आला. त्याने माधवरावांच्या शेजारची जमीन विकत घेतली आणि तिथे मोठी इमारत बांधण्याचे ठरवले. इमारतीचे काम वेगाने सुरू झाले. सिमेंटच्या गोण्या, विटा आणि जड साहित्यामुळे तिथला परिसर गजबजून गेला.

एक दिवस सकाळी कामगारांनी ते जुने पिंपळाचे झाड तोडण्याचा निर्णय घेतला. क्रेन आणि कुऱ्हाडीचा आवाज येऊ लागला. झाडावर राहणारे पक्षी जीव वाचवण्यासाठी इकडेतिकडे आरडाओरडा करत उडू लागले. त्यांची लहान पिल्ले घरट्यातच अडकली होती. हे दृश्य पाहून माधवरावांचे मन सुन्न झाले. त्यांनी तातडीने धाव घेतली आणि कंत्राटदाराला काम थांबवण्याची विनंती केली. ते म्हणाले, थांबा! हे झाड तोडू नका. हे फक्त झाड नाही, तर अनेक मुक्या जिवांचे घर आहे. आपण आपली घरे बनवताना या मुक्या प्राण्यांचे संसार का उद्ध्वस्त करत आहोत?

कंत्राटदार म्हणाला, साहेब, विकास करायचा असेल तर या गोष्टी कराव्याच लागतात. माधवरावांनी माघार घेतली नाही. त्यांनी आजूबाजूच्या तरुणांना जमा केले. त्यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. सर्वांच्या प्रयत्नांमुळे झाड तर वाचलेच, पण त्याचबरोबर महापालिकेच्या मदतीने परिसरातील इतर झाडे आणि पक्षांच्या सुरक्षेसाठी एक छोटी समिती स्थापन करण्यात आली. काही दिवसांनी तिथे पुन्हा पक्षांची किलबिलाट सुरू झाली. पिंपळाच्या फांद्यांवर पाखरे आनंदाने विसावली.

बोध : विकास आणि आधुनिकीकरण करताना निसर्गाचा आणि मुक्या प्राण्यांचा व पक्षांचा विसर पडू देऊ नये. त्यांनाही या पृथ्वीवर जगण्याचा आणि राहण्याचा पूर्ण अधिकार आहे.

## आत्मशक्ति



### करा परमेश्वरावर प्रेम

चालक, लिफ्टमन वा पोलिसांबरोबर जणू काय ते आपले नातेवाईकच आहेत असे समजून दोन शब्द बोललो तर त्यांना समाधान मिळेल. दुसऱ्याला आनंदी करण्यात आम्हाला जे सुख मिळते त्याचे वर्णन शब्दाने करता येत नाही. असे म्हटले जाते की कुणाकडून काही घेण्यापेक्षा त्यालाच काही देणे श्रेयस्कर असते. कारण काहीतरी दिल्याने आमचे हृदय विशाल होते, प्रसन्नतेने भरून जाते. जेव्हा आम्ही दुसऱ्यांशी जोडले गेल्याची अनुभूती घेतो, आम्ही दयाळू बनतो तेव्हा परमेश्वराशी जोडले जातो. यावरून मला अबू बिन अधम ह्यांच्या एका गोष्टीची आठवण होते. सर्वांवर प्रेम करणारा तो एक चांगला माणूस होता. एका मोठ्या पुस्तकामध्ये काही लिहित असलेल्या देवदूताने त्यांना एका रात्री जागे केले. आपण काय लिहीत आहात? अबू बिन अधमने विचारले. देवदूताने उत्तर दिले जे लोक परमेश्वरावर प्रेम करतात, अशा लोकांची मी यादी करीत आहे. माझे नाव तेथे आहे का? अबू बिन अधमांनी विचारे. देवदूताने शोधीत म्हटले, नाही! येथे तर तुझे नाव दिसत नाही. अबू बिन अधम यांनी म्हटले, ठीक आहे कृपया जे लोक आपल्या बरोबरच्या माणसांवर, परमेश्वराच्या सेवकांवर प्रेम करतात अशांच्या यादीमध्ये माझे नाव लिहा. पुढील रात्री तो देवदूत पुन्हा आला. त्यांचे नाव परमेश्वरावर प्रेम करणाऱ्या लोकांच्या यादीत सर्वप्रथम लिहिलेले असल्याचे त्यांनी दाखविले. परमेश्वराच्या सेवकांवर प्रेम करून अबू बिन अधम प्रत्यक्षात परमेश्वरांवरच प्रेम करीत होते. कारण जे लोक आपल्या साथीदारांवर प्रेम करतात ते परमेश्वराचे खरेखुरे प्रेमी असतात.

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### गर्भापासून सुरू होते प्रेम

सुरेश ओबेरॉय : असं म्हणतात की, बाळाचं अन्न आईने स्वतः शिजवावं कारण तिचं प्रेम त्या अन्नात मिसळतं.शिवानीदीदी : हो, हे सगळं स्पंदनांमुळे होतं.चिरंतन प्रेमाकडे घेऊन जाण्याचे मंत्रआत्मा जेव्हा आईच्या उदरात असतो तेव्हा त्याच्या शरीरापासून आणि कुटुंबापासून अनासक्त असतो. या अनासक्त अवस्थेत तो आईवडिलांची स्पंदनं ग्रहण करतो.आईच्या उदरात प्रवेश करणाऱ्या आत्म्याने नुकताच मृत्यू अनुभवलेला असतो. त्यामुळे गतजन्मातला वेदनेचा संस्कार त्याच्या बरोबर असतो. त्यामुळे, शुद्ध स्पंदनं निर्माण करून त्या आत्म्याची जखम भावनिक स्तरावर भरून काढणं ही नवीन पालकांची जबाबदारी आहे.टी.व्ही.वरील बातम्या, हिंसक किंवा भीतिदायक चित्रपट किंवा

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

चोर : साहेब, मी चोरी केली कारण गरिबी खूप वाढली आहे.

पोलिस : अरे मूर्खा, मग बँका लुटण्यापेक्षा बँकेत नोकरीसाठी अर्ज का नाही केला?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ केंद्र सरकारच्या कोणत्या मंत्रालयाने 'SMILE-75' हा उपक्रम सुरू केला आहे? – सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालय

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास – 'क्रांतीकारक...'

स्वातंत्र्यदिनी विविध जात, धर्म, पंथाच्या क्रांतीकारकांनी भारतमातेला पारतंत्र्यातुन – गुलामगिरीतुन मुक्त करण्यासाठी दिलेल्या बलिदाराचे स्मरण आपण केलेच पाहिजे. आज, आपण स्वातंत्र्यात आहोत त्यामुळे पारतंत्र्य माहित नाही. पण ज्यांनी स्वतःचा, संसाराचा विचार केला नाही, आपल्या मातृभूमीला पारतंत्र्यातुन मुक्त करण्यासाठी अथक परिश्रम घेतले, हाल अपेष्टा सोसल्या, त्या सर्व क्रांतिकारकांच्या भूमिकेत जाऊन विचार करणं, त्यांच्या ऋणाप्रति कृतज्ञता व्यक्त करणं, त्यांच्या बलिदानाचं स्मरण करणं प्रत्येक भारतीयाचं आद्य कर्तव्य आहे. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी आपलं देशप्रेम उफाळुन येतं. सकाळी राष्ट्रध्वजाला सलामी दिली की संपूर्ण दिवस आपलाच.

मग आपल्या मनाला येईल तसं वागायचं कारण स्वातंत्र्याचा अर्थ, अनेक व्यक्ती स्वैराचार असाच घेतात. मध्यंतरी नव्वदीच्या दरम्यान असलेल्या आजोबांना मी भेटलो. जुन्या काळातल्या, आजच्या काळातल्या अनेक विषयांवर मी बोललो. त्यांच्या बोलण्यातुन लक्षात आलं की इंग्रजांनी, भारतीयांवर पारतंत्र्यात अन्याय केला. पण सद्यस्थितीत काही व्यक्तींचं वागणं पाहून बोलणं ऐकुन असं वाटतं की पारतंत्र्य परवडलं. बालक्रांतीकारक शिरिष कुमार (शिरिष कुमार मेहता) हे भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील सर्वात तरुण हुतात्मांपैकी एक होते. ९ सप्टेंबर १९४२ रोजी 'भारत छोडो' आंदोलना दरम्यान नंदुरबार येथे तिरंगा झेंडा हातात घेऊन ब्रिटीश पोलीसांसमोर न झुकता त्यांनी वयाच्या १५ व्या वर्षी देशासाठी प्राणांची आहुती दिली. आज स्वातंत्र्यातला १५ वर्षांचा मुलगा नेमकं काय करतो आहे? तो स्वातंत्र्याचा उपयोग कसा करतो आहे ? हा विचार समाजाने का करु नये. भगतसिंगांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र लढा पुकारला. वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षी हसत हसत फासावर जाणे स्वीकारले. त्यांच्या ह्या असीम त्यागामुळेच आपण आज स्वातंत्र्यात आहोत. क्रांतिकारक बाबु गेणु कायम स्वदेशी वस्तुंचा वापर करत आणि गिरणी कामगारांमध्ये जाऊन स्वातंत्र्याविषयी व स्वदेशीविषयी जागरुकता निर्माण करत असत. १२ डिसेंबर १९३० रोजी ब्रिटीश मालाचा (परदेशी कापडाचा) एक ट्रक मुंबई बंदरातुन बाजारात नेण्यात येत होता. बाबु गेणु यांनी इतर सत्याग्रहींसोबत मिळुन तो ट्रक अडवला आणि परदेशी मालाची वाहतुक रोखण्यासाठी ते रस्त्यावर आडवे पडले. क्रुर ब्रिटीश चालकाने ट्रक थांबवण्याऐवजी बाबु गेनु यांच्या अंगावरुन घातला.

क्रुरतेचा हा कळस. बाबु गेणुच्या भूमिकेत जाऊन विचार करणारे आज कितीजण सापडतील? स्वातंत्र्य दिन साजरा करणं प्रत्येक भारतीयाचं आद्य कर्तव्य आहे. हे स्वातंत्र्य चिरायु राहावं ह्यासाठी मी काय प्रयत्न करतो हा विचार स्वातंत्र्यादिनी करणं अत्यंत महत्वाचं आहे. जे आपण मत्प्रयासानं मिळवलेलं नसतं, जे आपल्याला आयतं मिळालेलं असतं, त्याच अमूल्यत्व आपल्याला समजत नसतं हा निसर्ग नियम आहे. क्रांतिकारकांच्या भूमिकेत आपण कधी जाणार आहोत ? त्यांची एकनिष्ठता, त्यांचं ध्येय, त्यांचं मातृभुमीविषयीचं प्रेम, त्यांचं समर्पण आपण कधी समजुन घेणार आहोत ? निसर्गनियम आहे की प्रत्येकाला स्वतःचा जीव अत्यंत प्रिय असतो. मृत्यूची भिती प्रत्येकाला वाटत असतेच. पण भारतमातेला गुलामगिरीतुन मुक्त करण्यासाठी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता बलिदान देणाऱ्या विविध जात, धर्म, पंथांच्या क्रांतिकारकांचे ऋण आपण कधीच फेडु शकणार नाहीत. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी त्यांनी हाल अपेष्टा सोसल्या, ह्याचं स्मरण आपण आज करायलाच पाहिजे.

तारुण्यात भगतसिंग, सुखदेव, राजगुरु भारतमातेला पारतंत्र्यातुन मुक्त करण्यासाठी फासावर गेले, हे स्मरण आजची तरुण मुलं करतात का ? ज्यांच्या ऋणातुन आपण कधीच उतराई होऊ शकत नाही, त्या सर्वच क्रांतिकारकांचं स्मरण खरं तर दररोज करणं आपलं आद्य कर्तव्य आहे. देशभक्तीची गाणी ऐकुण आपल्याला जी स्फुर्ती मिळते ती फक्त स्वातंत्र्यदिना पुरती मर्यादित न राहता दररोज ह्या राष्ट्रप्रेमाच्या स्फुर्तीनं मी भारतमातेसाठी अर्थात मातृभुमीसाठी, राष्ट्रासाठी काय काय करु शकतो ह्याविषयी विचार आणि तशी कृती केलीच पाहिजे. मनात येणाऱ्या नकारात्मक विचारांचं पारतंत्र्य झुगारुन देणं, सकारात्मक विचारांची क्रांतीची मशाल पेटवणं आपल्याच हातात आहे. स्वातंत्र्य चिरायु ठेवण्यासाठी आपण नेमकं काय-काय केलं पाहिजे. ह्याचा विचार आमि तशी कृती स्वातंत्र्यदिनापासून केलीच पाहिजे. खरं तर मी फक्त माझ्यापुरतं जरी प्रामाणिक राहिलो तरी खुप झालं कारण हेच खरं देशप्रेम, देशाप्रति निष्ठा आहे. स्वातंत्र्य चिरायु ठेवण्यासाठी महत्वाचं आहे ते ते सगळं अगदी मनापासुन करुया. दररोज क्रांतिकारकांचं स्मरण करुया, कृतज्ञता व्यक्त करुया.

(लेख क्र.६१३)

**– सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

### ज्वारी

ज्वारीचे रंगानुसार, चवीनुसार व प्रदेशानुसार अनेक प्रकार आहेत. त्यामध्ये पांढरी ज्वारी, लाल ज्वारी व अरगड हे प्रकार आहेत. तसेच सोलापुरी व खानदेशी ज्वारी असेही प्रदेशानुसार प्रकार पडतात. ज्वारी प्रथम पश्चिम आफ्रिकेत निर्माण झाली. तेथून ती एकोणिसाव्या शतकात अमेरिकेत पोहोचली. आज आफ्रिका, आशिया या खंडांमध्ये पावसाळी पीक म्हणून ती पिकविली जाते. भारतामध्ये ज्वारी सर्वत्र पिकविली जाते. तिची रोपे तीन-चार हात उंच वाढतात. ज्वारीच्या या रोपांना ताटे असे म्हणतात व यालाच ज्वारीची कणसे लागतात. या कणसांमध्ये दाणे तयार होतात. या दाण्यांनाच ज्वारी असे म्हणतात.औषधी गुणधर्म :आयुर्वेदानुसार : ज्वारी पित्तनाशक, मधुर, शीत गुणधर्माची, रूक्ष, वायुकारक व रक्तदोष दूर करणारी आहे.

आधुनिक शास्त्रानुसार : ज्वारीमध्ये कॅल्शिअम, फॉस्फरस, लोह, कॅरोटीन, थायमिन, नायसिन, रिबोफ्लेविन, स्निग्धता, प्रथिने, खनिजे, मेद, तंतुमय व पिष्टमय पदार्थ हे सर्वच शरीरास उपयुक्त असणारे पोषक घटक असतात.

उपयोग : १) शेतामध्ये ज्वारीची कोवळी कणसे भाजून त्याचा हुरडा बनविला जातो. हुरडा अतिशय मधुर व चविष्ट असून, आरोग्यास गुणकारी असतो. हिवाळ्यामध्ये प्रत्येकाने हुरड्याचा आस्वाद घेऊन आरोग्य अबाधित ठेवण्याचा प्रयत्न करावा. ऋतुनुसार निर्माण झालेले धान्य प्रत्येकानेच खाऊन त्यातील शरीरास उपयुक्त पोषक घटकांचा लाभ घेणे आवश्यक आहे.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



रोटरी क्लब मिडटाउन आणि जे.जे.सायन्स अक्ॅडमीच्या वतीने घेण्यात आलेल्या वैज्ञानिक स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण करताना डॉ.प्रकाश गरुड व श्रीमती छाया फिरोदिया. समवेत पदाधिकारी.

# विद्यार्थ्यांच्या यशस्वी गरुडझेपसाठी वैज्ञानिक स्पर्धेचा उपक्रम खूप उपयुक्त

## डॉ. प्रकाश गरुड, सायन्स स्पर्धेत बाल वैज्ञानिकांनी बनवले नाविन्यपूर्ण उपकरणे

नगर – विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांचा व पालकांचे मोठे योगदान असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी त्यांना कधीही विसरू नये. वैज्ञानिक स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी कल्पनेच्या पलीकडचे नाविन्यपूर्ण उपकरणे बनवून सादर केले आहेत. विद्यार्थ्यांच्या भविष्यातील यशस्वी गरुडझेपसाठी असे उपक्रम खूप उपयुक्त आहेत. यासाठी या स्पर्धेला गरुड हॉस्पिटलने सहकार्य केले आहे. आबालवृद्धांना सुखावणारे काम रोटरी क्लबच्या माध्यमातून होत आहे, असे प्रतिपादन कर्करोग तज्ज्ञ डॉ.प्रकाश गरुड यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ अहमदनगर मिडटाउन आणि जे.जे.सायन्स अक्ॅडमीच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या जिल्हास्तरीय शालेय यंग इनोव्हेस्टर्स सायन्स स्पर्धेचे पारितोषिक वितरण कर्करोग तज्ज्ञ डॉ.प्रकाश गरुड व अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या जनरल सेक्रेटरी श्रीमती छायाताई फिरोदिया यांच्या हस्ते झाले. यावेळी रोटरी क्लबचे आगामी प्रांतपाल क्षितिज झावरे, स्पर्धेचे परिक्षक मुंबईच्या भाभा परमाणु अनुसंधान केंद्राचे माजी न्युक्लिअर मेडिसीन शास्त्रज्ञ डॉ.राजशेखरराव बोक्का व माजी प्राचार्य डॉ.भास्करराव झावरे, रोटरी क्लब मिडटाउनचे अध्यक्ष ड.हेमंत कराळे, सेक्रेटरी मधुर बागायत, जे.जे.सायन्स अक्ॅडमीचे प्रा.योगेश जहागीरदार व प्रा.कृष्णकांत झा, उपक्रम प्रमुख मर्लिन एलिशा व प्रसाद उबाळे, महेश गोपालकृष्णन यांच्यासह रोटरीचे सदस्य व नागरिक उपस्थित होते. या स्पर्धेत जिल्ह्यातील १२० शाळांमधील इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता. रोटरी क्लबचे प्रांतपाल जयेश पटेल यांनी या प्रदर्शंस भेट देऊन पाहणी करताना विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले.

छायाताई फिरोदिया म्हणाल्या, विद्यार्थ्यांसाठी वैज्ञानिक स्पर्धेचे आयोजन करून रोटरी मिडटाऊन क्लबने विद्यर्थ्यांच्या विचारांना व प्रयत्नांना नवे पंख दिले आहेत. विद्यार्थ्यांनी कल्पकतेने केलेले वैज्ञानिक उपकरणे पाहून मोठे समाधान व आनंद वाटत आहे. रोटरीचे क्लब मिडटाउनचे शैक्षणिक सह सर्वच क्षेत्रात अतिशय उत्कृष्टपणे काम सुरु आहे.

शास्त्रज्ञ डॉ.राजशेखरराव बोक्का यांनी सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले, अहिल्यानगर मधील बाल शास्त्रज्ञांमध्ये खूप कौशल्य असल्याने त्यांनी वैशिष्ठपूर्ण वैज्ञानिक उपकरणे बनवली. त्यामुळे या प्रदर्शनामधून मलाही खूप काही शिकण्यास मिळाले आहे. रोटरी क्लब मिडटाउन व जे.जे.सायन्स अक्ॅडमीने विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध केलेल्या या व्यासपीठामुळे त्यांच्यातून उद्याचे शास्त्रज्ञ निर्माण होतील.

प्रांतपाल जयेश पटेल यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन या वर्षात ग्रामीण भागातील १५० शाळांना डिजिटल क्लासरूम देणार आहे. विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त आशा उपयुक्त स्पर्धांमध्ये सहभागी होत भरपूर प्रयोग करून भविष्यात आपल्या कौशल्याचा वापर देशाच्या प्रगतीसाठी करावा, असे आवाहन केले.

यावेळी प्रास्ताविकात ड.हेमंत कराळे व योगेश जहागीरदार यांनी स्पर्धेच्या आयोजनाचा उद्देश विषद केला. मर्लिन एलिशा यांनी सूत्रसंचालन केले. सेक्रेटरी मधुर बागायत यांनी आभार मानले. यावेळी डॉ.पद्मजा गरुड, डॉ. योगेश गरुड, प्रतापसिंग पांडये, ड.वैशाली कराळे, मधुरा झावरे, टीना इंगळे, डॉ.विनोद मोरे, संदीप भापकर व राहुल मिश्रा यांच्यासह रोटेरियन, विविध क्षेत्रातील नागरिक, पालक उपस्थित होते.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे – प्रथम रेणावीकर माध्यमिक विद्यालय रुपये ३० हजार व करंडक, द्वितीय श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशन रुपये २० हजार व करंडक, तृतीय सेक्रेड हार्ट स्कूल रुपये १० हजार व करंडक, विशेष उल्लेखनीय पारितोषिक ज्ञानसंपदा स्कूल.

# प्रेरणादायी अक्षरधन

## सामर्थ्याचा गाभा







त्यांचा सदैव प्रयत्न लोकांना लुबाडायचा. माणुसकीचा कधी विचारच नाही करायचा. विचार करायला तो न्याय, नीती धाब्यावर बसवायचा. त्यांना एकच ध्यास, स्वार्थ साधायचा, पण अशांना का घाबरायचे? त्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवायचे. धैर्य व विवेक राखायचे त्यांचे डावपेच धुळीला मिळवायचे. तरच सुखाने जगता यायचे. अन्यथा सगळे गमवायचे. अथर्ववेदात वर्णिले आहेत असे लबाडलुचे मार्ग सांगितलाय त्यांना कसे वठणीवर आणायचे ?

तुमच्या मागेच उभे असतात असे वंचक. अवतीभवती सदैव संचार असतो त्यांचा, पण त्यांची चाल असते वाकडी. मनात दुष्टपणा भरलेला दुथडी. अंधारात चालतात त्यांच्या कारवाया. सापडले तर करतात गयावया. त्यांची आपापसात चालतात खलबते, पण तो राजा वरुण, असतो सदा जागृत बारीक लक्ष देतो या दुष्टांच्या कारवायांकडे आणि करतो त्या विफल. कारण तो असतो सदैव दक्ष. धैर्यवान, निर्भय, पण कुठे आहे असा वरुण? कोण आहे तसा वरुण? असे माणसा, तुच आहे तो वरुण. तुझं मजबूत मन, त्यात वततो तो वरुण. वेदकाळी पाळायचे वरुणाचे व्रत. ठेवायचे मन खंबीर. संकटकाळी करायचे विचार गंभीर. मग यायचा त्यांना विलक्षण धीर. उद्ध्वस्त करायचे या दुष्टांच्या कारवाया. आश्वस्त करायचे सर्वांना. माणूसच रक्षण देतो माणसांना.

स्वामी समर्थ रामदासांनी वज्रहनुमान मारुती कल्पिला या अथर्ववेदकालीन वरुणाऐवजी. तो हनुमंत कसा? सामर्थ्याचा गाभा भीम भयानक उभा।पाहता सुंदर शोभा। हनुमंताला पाहून मनाला मोह होतो की आपणही व्हावे असेच सामर्थ्यसंपन्न सदैव जागरूक. नेहमी उत्सुक. कुणालाही वाटावे तुमचे भयपूर्ण कौतुक. असावे हनुमंताप्रमाणेच शक्तिसंपन्न. मनाने बलवंत शक्ती शरीराची, मनाचीही हवी.

एक कहाणी आहे एक होता कुंभार. त्याच्याकडे होते लग्न वरातीसाठी त्यानं भाड्यानं आणला एक घोडा. वरात फिरतानाच तो जमिनीवर कोसळला आणि मरण पावला. घोड्याचा मालक आला. कुंभार म्हणाला, किंमत देतो घोड्याची तुला. सांग कितीती मला? दहा हजार की वीस हजार.

घोड्याचा मालक म्हणाला, पैसे नकोत, मेलेला घोडा परत हवा. तो खानदानी घोडा होता. आमच्या कुटुंबाच तो एक घटक होता. मला माझा घोडाच परत हवा. भांडण न्यायाधीशाकडे गेले. न्यायाधीशाने घोड्याच्या मालकाचे मागणे ऐकले आणि कुंभाराला जवळ बोलावून त्याच्या कानात काहीतरी सांगितले. न्याय उद्या देतो, असे जाहीर केले.

दुसरे दिवशी न्यायालयात, न्यायाधीशाने सांगितल्याप्रमाणे कुंभार आला नाही. न्यायाधीशाने घोड्याच्या मालकाला सांगितले. कुंभाराच्या घरी जा. व त्याला घेऊन ये. मालक कुंभाराकडे गेला. न्यायाधीशाने कानात सांगितल्याप्रमाणे कुंभाराने घराचे दार लोटून ठेवले होते. आतून कडी घातली नव्हती. घोड्याच्या मालकाने ते दार ढकलले. ते उघडले पण त्याचवेळी आतून त्या दाराला टेकवून ठेवलेली मातीच्या मडक्यांची उतरंड जोराने जमिनीवर पडली व फुटली. आता कुंभार घोड्याच्या मालकाला म्हणाला, माझी मडक्यांची उतरंड परत दे.

घोड्याचा मालक म्हणाला, पैसे घे. वाटल्यास दुसरी उतरंड देतो. कुंभार ऐकेना. तो न्यायाधीशाकडे गेला व म्हणाला, याने माझी उतरंड फोडली. तीच परत करावी. घोड्याचा

मालक म्हणाला, न्यायाधीश महाराज. फुटलेली मडकी कशी परत करू? न्यायाधीश म्हणाले, जसा मेलेला घोडा परत करायचा म्हणतोस तसेच. घोड्याचा मालक काय ते समजला.

– किशोर गांधी

# श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त सरस्वती हॉस्पिटलच्यावतीने १२ ऑगस्टपर्यंत महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर

नगर – श्री संत सावता महाराज यांच्या पुण्यतिथीच्यानिमित्ताने सामाजिक बांधिलकीतून सरस्वती हॉस्पिटल यांच्या वतीने महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर ७ ते १२ ऑगस्टपर्यंत दररोज दुपारी ३ ते ५ या वेळेत सरस्वती हॉस्पिटलमध्ये होणार आहे, अशी माहिती हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. अमोल जाधव यांनी दिली.

सरस्वती हॉस्पिटल आणि श्री संत सावता महाराज उत्सव समिती यांच्या वतीने महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन उत्सव समितीचे प्रमुख छबूनाना जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी सरस्वती हॉस्पिटलचे डॉ. अमोल जाधव, दत्ता जाधव, आदेश जाधव, उत्सव समितीचे जालिंदर महाराज निकम, सतीश डागवाले, सुभाष राऊत, बाळासाहेब पुंड, अनिल चेडे, श्रीहरी ढवळे, प्रकाश मुळे, मानसी जाधव, उज्वला शेरकर, प्रतिभा केळकर, सावेरी सत्रे, कावेरी सत्रे, डॉ. ऐश्वर्या डागवाले, किरण लोंढे, मनोज गाडळकर, ओंकार शिंदे, वसंत होले, गौरी सातपुते, सुनीता पोतदार, पायल बनसोडे आदी उपस्थित होते.



श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन करताना छबूनाना जाधव. समवेत डॉ. अमोल जाधव, दत्ता जाधव, आदेश जाधव, उत्सव समितीचे जालिंदर महाराज निकम, सतीश डागवाले आदी.

महिलांचे आरोग्य हे कुटुंबाच्या सुदृढतेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. परंतु बहुतेक वेळा महिलांकडून स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे त्यांच्या आरोग्याचा प्राथमिक टप्प्यावर आढावा घेणे गरजेचे असते. या शिबिराच्या माध्यमातून आम्ही महिलांना मोफत तपासणीची सुविधा उपलब्ध करून देत आहोत, असे डॉ. जाधव यांनी सांगितले.

श्री संत सावता महाराज उत्सव समिती दरवर्षीप्रमाणे सप्ताहाचे आयोजन करत असते. या धार्मिक सप्ताहाला आरोग्याची जोड लागावी म्हणून आमच्या सरस्वती सुपर मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटलच्या वतीने आम्ही दरवर्षी मोफत महिलांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करत असतो. तसेच सवलतीच्या दरामध्ये शस्त्रक्रिया केली जातील. शिबिरात विविध तपासण्या व मार्गदर्शन केले जाणार आहे. महिलांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

सूत्रसंचालन किरण लोंढे यांनी केले. आभार आदेश जाधव यांनी मानले.

# पाश्चात्य कलांपेक्षा भारतीय कला शाश्वत आहेत

## राजाभाऊ मुळे यांचे प्रतिपादन; श्रुती संगीत निकेतनच्या नादसरिता पुरस्कारांचे वितरण

नगर – पाश्चात्य कलांपेक्षा भारतीय कला शाश्वत आहेत. कलेकडे पाहण्याची दृष्टी बदलण्याची गरज आहे असे मत राजाभाऊ मुळे यांनी व्यक्त केले.

श्रुती संगीत निकेतन या संस्थेच्या वतीने डॉ. देवीप्रसाद खरवंडीकर आणि कीर्तीदेवी खरवंडीकर यांच्या पुण्यस्मृती निमित्त नादसरिता या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी ते बोलत होते. संगीत क्षेत्रात कार्य करणाऱ्या दाम्पत्याला या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यावर्षी या पुरस्काराचे तिसरे वर्ष होते, यावर्षी हा पुरस्कार पुणे येथील चिन्मय जोगळेकर आणि सौ. वैभवी जोगळेकर यांना प्रदान करण्यात आला. संगीत नाटक क्षेत्रात केलेल्या बहुमोल कामगिरी बद्दल चिन्मय जोगळेकर आणि भरतनाट्यम क्षेत्रात कार्य करणाऱ्या वैभवी जोगळेकर यांना सदर पुरस्कार अहिल्यानगर येथील रविंद्र (राजाभाऊ) मुळे आणि सौ.मनिषा मुळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ११ हजार रुपये, सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.



श्रुती संगीत निकेतन या संस्थेच्या वतीने चिन्मय जोगळेकर आणि सौ. वैभवी जोगळेकर यांना नादसरिता पुरस्कार वितरण करताना राजाभाऊ मुळे व सौ.मनिषा मुळे. समवेत मान्यवर.

राजाभाऊ मुळे यांनी या प्रसंगी, खरवंडीकर आणि बोपर्डीकर यांनी नगरच्या संगीत क्षेत्रास दिलेल्या योगदाना बद्दल गौरव केला. पुरस्काराला उत्तर देताना वैभवी जोगळेकर यांनी आभार व्यक्त केले आणि संस्थेच्या कार्याचा गौरव केला. या पुरस्कार वितरण सोहळ्याच्या प्रसंगी चिन्मय जोगळेकर यांची नाट्यसंगीत गायनाची तसेच वैभवी जोगळेकर यांची भरतनाट्यम नृत्याची नाट्यगंगा ही मैफल आयोजित करण्यात आली होती. वैभवी जोगळेकर यांनी जयमालाबाई शिलेदार आणि कीर्ती शिलेदार तसेच पं.राम मराठे यांच्या ध्वनिमुद्रित नाट्यपदांवर भरतनाट्यम शैलीत नृत्य सादर केले. याप्रसंगी त्यांचा पदन्यास आणि अभिनय रसिकांची विशेष दाद घेऊन गेले.

तद्नंतर चिन्मय जोगळेकर यांनी नाट्यसंगीताच्या परंपरेनुसार स्वरसम्राज्ञी नाटकाच्या नांदीने सुरुवात करून प्रिये पहा, रागिणी मुखचंद्रमा, युवती मना, श्रीरंगा कमलाकांता अशी लोकप्रिय नाट्यपदे सादर केली. यावेळी त्यांचा आवाज, ताना रसिकांच्या वन्स मोअरची दाद घेऊन गेले. या मैफलीला तबल्यावर शेखर दरवडे, ऑर्गनवर मकरंद खरवंडीकर यांनी नाट्यगीतांना साजेशी उत्कृष्ट साथसंगत केली. ओघवत्या शैलीत डॉ.धनश्री खरवंडीकर यांनी निवेदन केले. पुरस्कार वितरण सोहळ्याचे सूत्रसंचालन स्नेहल उपाध्ये यांनी केले.

या कार्यक्रमासाठी दिलीप गुंजाळ आणि महेश पवार यांच्या अमृतवाहिनी ग्राम विकास मंडळ संचालित मानवसेवा प्रकल्प यांचे बहुमोल सहकार्य लाभले होते. या प्रसंगी विविध संगीत परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी कुमुदिनी बोपर्डीकर, दिलीप जोशी, भूषण भणगे, अशोक गांधी, सुरेखा डावरे, अपर्णा थत्ते, लक्ष्मणराव डहाळे,अविनाश देऊळगावकर, सविता काळे,मंजुषा देशमुख इत्यादी संगीत क्षेत्रातले मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वेदांत कुलकर्णी, समर्थ कोर्टीकर, शौनक कुलकर्णी आर्या कुलकर्णी, स्वराली जोशी, रिद्धी कुलकर्णी आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# महात्मा फुले जन आरोग्य योजना 'डेंटल क्लिनिक' मध्ये लागू करावी

## अंदाज समिती अध्यक्ष आ.अर्जुन खोतकर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

नगर – सर्वसामान्य व गोरगरीब रुग्णांचे हित लक्षात घेता महात्मा फुले जन आरोग्य योजना ही मल्टीस्पेशालिटी व मोठ्या हॉस्पिटल मध्ये लागू आहे, परंतु ही महात्मा फुले जन आरोग्य योजना प्रत्येक डेंटल क्लिनिक मध्ये लागू व्हावी अशी मागणी डेंटल सर्जन असोसिएशन तर्फे अंदाज समिती अध्यक्ष आ.अर्जुन खोतकर याच्याकडे करण्यात आली. समिती अध्यक्ष अहिल्यानगर दौऱ्यावर आली असता विश्रामगृह येथे निवेदन देण्यात आले.



महात्मा फुले जन आरोग्य योजना डेंटल क्लिनिक मध्ये लागू करावी या मागणीचे निवेदन अंदाज समिती अध्यक्ष आ.अर्जुन खोतकर यांना देताना डेंटल सर्जन असोसिएशन ऑफ इंडियाचे डॉ सुदर्शन गोरे.

प्रत्येक डेंटल क्लिनिक मध्ये महात्मा फुले जन आरोग्य योजना लागू झाल्यास सर्वसामान्य रुग्णांना दाताचे उपचार हे योजनेच्या माध्यमातून मिळू शकतील. तसेच रूट कॅनॉल ट्रीटमेंट, कॅप बसवणे, फिक्स दात बसवणे, दातांचे सर्व उपचार महात्मा फुले जन आरोग्य योजनेमध्ये समाविष्ट करून सर्वसामान्य रुग्णांना याचा मोठ्या प्रमाणावर फायदा होईल असे डेंटल सर्जन असोसिएशन ऑफ इंडियाचे डॉ सुदर्शन गोरे यांनी सांगितले.

तरी शासनाचा प्रतिनिधी व अंदाज समितीचे अध्यक्ष म्हणून आपण महाराष्ट्र शासनाकडे याचा पाठपुरावा करील असे आश्वासन आ. अर्जुन खोतकर यांनी दिले. या प्रसंगी वांबोरी येथील अशोक तुपे, निखिल शेलार उपस्थित होते.

# सोनाली शिंदे-गरुड यांना मराठी विषयात पीएचडी

## आगरकरांच्या बुद्धिप्रामाण्यवादी विचारांचा संशोधनातून उलगडा

नगर – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मानव्यविद्या शाखेअंतर्गत मराठी विषयात सोनाली शिंदे – गरुड यांना विद्यावाचस्पती (पीएचडी) प्रदान करण्यात आली आहे. गोपाळ गणेश आगरकर विषयक मराठीतील चरित्रपर लेखांचा अभ्यास या विषयावरील त्यांच्या संशोधन प्रबंधाला विद्यापीठाने मान्यता दिली असून, त्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने पीएचडी सोनाली शिंदे – गरुड यांना प्रदान करताना प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे, पुणे विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख डॉ. तुकाराम रोंगटे, डॉ. प्रकाश गरुड, मार्गदर्शक प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित.

या संशोधन कार्यासाठी सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी संशोधन मार्गदर्शक म्हणून मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन पूर्ण करताना सोनाली शिंदे यांनी गोपाळ गणेश आगरकर यांच्या विचारांचा, मराठीतील चरित्रपर लेखनाचा आणि त्यामागील सामाजिक, वैचारिक व साहित्यिक संदर्भांचा सखोल अभ्यास केला आहे.

सोनाली शिंदे या डॉन बॉस्को उच्च माध्यमिक विद्यालयात मराठी विषयाच्या अध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. अध्यापनासोबतच संशोधनाची आवड जोपासत त्यांनी हा महत्त्वपूर्ण शैक्षणिक टप्पा यशस्वीपणे पूर्ण केला आहे. या संशोधनातून त्यांनी समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर यांच्या बुद्धिप्रामाण्यवादी, विवेकनिष्ठ आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभ्यास केला आहे. समाजातील अंधश्रद्धा, रूढी-परंपरा आणि अवैज्ञानिक विचारांना छेद देत वैज्ञानिक दृष्टीकोन रुजविण्याची गरज आजही तितकीच महत्त्वाची असल्याचे त्यांनी आपल्या संशोधनातून अधोरेखित केले.

मराठीतील चरित्रपर लेखनाच्या अभ्यासातून आगरकरांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे सामाजिक कार्य, वैचारिक योगदान आणि आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत असलेले स्थान यांचे चिकित्सक विश्लेषण या संशोधनात करण्यात आले आहे. सोनाली शिंदे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल डॉन बॉस्को विद्यालयाचे प्राचार्य फादर अजित मुनीस यांनी अभिनंदन केले आहे.

# स्वातंत्र्यदिनानिमित्त अहिल्यानगरमध्ये सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन

## विविध क्षेत्रातील व्यक्तीं, संस्थांचा 'उडाण पुरस्कार' देवून होणार गौरव

नगर – जय असोसिएशन ऑफ एनजीओ (महाराष्ट्र राज्य) संलग्न उडाण फाउंडेशनच्या वतीने भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम, देशभक्तीपर गीत स्पर्धा, नृत्य स्पर्धा तसेच 'महाराष्ट्राची लोकधारा' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. १५ ऑगस्ट रोजी शहरातील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, टिळक रोड येथे हा सोहळा उत्साहात पार पडणार असून, विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा राज्यस्तरीय 'उडाण पुरस्कार' देऊन गौरव करण्यात येणार आहे.



रुपाली करांडे | सागर ससाणे | ज्योत्स्ना शिंदे | अरबाज शेख | सीए शंकर अंदानी

महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या राही फाउंडेशनच्या संचालिका रूपाली करांडे, औद्योगिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे सागर ससाणे, शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे कार्य करणाऱ्या सेंट सेव्हिअर्स हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्य ज्योत्स्ना शिंदे, युनिटी योगा संस्था शहरात योगाचा प्रचार-प्रसार करण्यासाठी सातत्याने कार्यरत असून, विविध ठिकाणी शास्त्रोक्त योग प्रशिक्षण, संतुलित आहाराचे महत्त्व, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी योगवर्ग तसेच विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे. याच संस्थेचे प्रशिक्षक अरबाज शेख यांनी योगाच्या जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळविले असून, त्यांच्या कार्याचा गौरवही राज्यस्तरीय उडाण पुरस्काराने केला जाणार आहे. साहित्य क्षेत्रात जागतिक विक्रम करणारे, व्यवसायाने चार्टर्ड अकाउंटंट तसेच १०६ पुस्तकांचे लेखक प्रा. डॉ. शंकर अंदानी यांच्या 'लेक लाडकी' या स्वलिखित पुस्तकालाही राज्यस्तरीय उडाण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

याशिवाय लावणी क्षेत्रातील प्रसिद्ध लावणी साम्राज्ञी रोहिणी थोरात, नाट्य अभिनय व दिग्दर्शन क्षेत्रातील अनंत जोशी, अभिनय क्षेत्रातील विद्या जोशी, नृत्य विशारद व सामाजिक जनजागृती करणारे अनंत द्रविड, लेखिक प्रा. च.वी. जोशी, साहित्यिक सुनील राऊत, विमा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे विनायक नेवसे, गीत गायन क्षेत्रातील सुनील महाजन व राजेंद्र टाक, नाट्य अभिनय क्षेत्रातील सागर खिस्ती, लोककलावंत राजेश व्यवहारे, शैक्षणिक क्षेत्रात काम करणारे साधना काकडे,माहेर संस्थेच्या माध्यमातून महिला समुपदेशन करणाऱ्या रजनी ताठे, अनाथ मुलांचे संगोपन करणारे प्रा. सुनील मतकर तसेच अजय फाउंडेशनच्या माध्यमातून कॅन्सर जनजागृती करणाऱ्या विद्या तन्वर यांनाही राज्यस्तरीय उडाण पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

या पुरस्कार वितरण सोहळ्यास आ. संग्राम जगताप, आ. अक्षय कर्डिले, आ. डॉ. किरण लहामटे, पुष्पाताई लहाने, ड. प्रसाद साळुंके, आंतरराष्ट्रीय खेळाडू व कुस्तीतील सुवर्णपदक विजेत्या कुस्तीपटू डॉ. शबनम शेख, मेहरनाथ कलचुरी, विशेष जिल्हा सरकारी वकील ड. सुरेश लगड, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, माय भारतचे सत्यजित संतोष तसेच जय असोसिएशनचे राज्याध्यक्ष ॲड. महेश शिंदे यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण होणार असल्याची माहिती उडाण फाउंडेशनच्या अध्यक्षा ड. आरती शिंदे व कायदेशीर सल्लागार दिनेश शिंदे यांनी दिली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अक्षय शिंदे, जयश्री शिंदे, ॲड. मनीषा भिंगारदिवे, भीमराव उल्हारे, डॉ. ईसा शेख, ॲड. गायत्री गुंड, ड. तुषार शेंडगे, मीनाताई म्हसे, भाऊसाहेब पादीर, अनिल साळवे, राजकुमार चिंतामणी, ड. विद्या शिंदे, तुषार रणनवरे, रावसाहेब मगर, स्वाती डोमकावळे, वनिता पाडळे, मंजू रॉय, कविता अभंग, अश्विनी वाघ आणि रावसाहेब काळे हे परिश्रम घेत असून, स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या सांस्कृतिक महोत्सवाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# ऑनलाईन प्रॉपर्टी शोधताना 'या' चुका टाळा!

## घर शोधा स्मार्टपणे, फसवणूक टाळा खात्रीने! भाग - ३ (समारोप)

**✻ प्रथमच घर खरेदी करणाऱ्यांसाठी काही खास सूचना**

पहिल्यांदाच घर खरेदी करताना बहुतेक जण घराचे सौंदर्य, अंतर्गत सजावट किंवा सवलतीच्या ऑफर पाहून प्रभावित होतात. मात्र अनुभवी खरेदीदारवेगळ्या गोष्टी तपासतात– बांधकामाची गुणवत्ता, परिसराचा विकास, कायदेशीर कागदपत्रे आणि भविष्यातील पुनर्विक्री मूल्य. निर्णय घेण्यापूर्वी किमान दोन ते तीन पर्यायांची तुलना करा. एकाच दिवशी किंवा पहिल्याच भेटीत कोणत्याही प्रकल्पाला अंतिम होकार देण्याची घाई करू नका.

**✻ प्रथमच घर खरेदी करणाऱ्यांसाठी २० मुद्यांची चेकलिस्ट**

१. स्वतःचे वास्तववादी बजेट ठरवले आहे.
२. गृहकर्ज पात्रता आधीच तपासली आहे.
३. प्रकल्पाची RERA नोंदणी तपासली आहे.
४. विकासकाची पूर्वीची कामगिरी पाहिली आहे.
५. परिसराला प्रत्यक्ष भेट दिली आहे.
६. दिवस आणि रात्री दोन्ही वेळा परिसर पाहिला आहे.
७. पाणी, वीज आणि रस्त्यांची स्थिती तपासली आहे.
८. शाळा, रुग्णालये आणि सार्वजनिक वाहतूक पाहिली आहे.
९. पूरप्रवण किंवा पर्यावरणीय जोखमींची माहिती घेतली आहे.
१०. सर्व महत्त्वाची कागदपत्रे पडताळली आहेत.
११. Carpet Area समजून घेतली आहे.
१२. अतिरिक्त खर्च (स्टॅम्प ड्युटी, नोंदणी, देखभाल इ.) मोजले आहेत.
१३. करार पूर्ण वाचला आहे.
१४. अधिकृत बँक खात्यातच रक्कम भरली आहे.
१५. प्रत्येक व्यवहाराची पावती घेतली आहे.
१६. फक्त ऑनलाइन फोटोवर विश्वास ठेवलेला नाही.
१७. शेजारच्या बाजारभावाची तुलना केली आहे.
१८. सर्व ई-मेल, संदेश आणि कागदपत्रे सुरक्षित ठेवली आहेत.
१९. आवश्यक असल्यास कायदेशीर तज्ज्ञांचा सल्ला घेतला आहे.
२०. कोणत्याही दबावाखाली निर्णय घेतलेला नाही

**✻ फक्त फ्लॅट नव्हे, संपूर्ण परिसर निवडा**

घरातील सुविधा महत्त्वाच्या असतातच; पण पुढील दहा-पंधरा वर्षे ज्या परिसरात राहायचे आहे, त्याचाही विचार तितकाच आवश्यक आहे.

**स्वत:ला काही प्रश्न विचारा**

✻ परिसरात पुरेशा शाळा, रुग्णालये आणि सार्वजनिक वाहतूक आहे का?

✻ पाणीपुरवठा आणि वीज व्यवस्था नियमित आहे का?

✻ भविष्यात मेट्रो, रिंगरोड किंवा इतर पायाभूत सुविधा विकसित होणार आहेत का?

✻ परिसर सुरक्षित आणि कुटुंबासाठी अनुकूल आहे का?

चांगला परिसर हा घराच्या भविष्यातील किंमतवाढीचाही महत्त्वाचा आधार असतो.




**✻ बिल्डर, ब्रोकर आणि खरेदीदार – तिघांची जबाबदारी वेगळी**

यशस्वी व्यवहारासाठी प्रत्येकाची भूमिका स्पष्ट असणे आवश्यक आहे.

विकासक (Builder) याने प्रकल्पाची सर्व माहिती पारदर्शकपणे देणे, वेळेत बांधकाम पूर्ण करणे आणि आवश्यक परवानग्या घेणे अपेक्षित असते.

दलाल किंवा सल्लागार (Broker/ Consultant) याने योग्य माहिती देणे, व्यवहार सुलभ करणे आणि चुकीची माहिती न देणे ही जबाबदारी पार पाडली पाहिजे. खरेदीदाराने मात्र सर्व माहितीची स्वतंत्र पडताळणी करूनच अंतिम निर्णय घ्यावा. एजंटने सांगितले होते हे कोणत्याही वादात पुरेसे संरक्षण ठरत नाही.

**✻ ज्येष्ठ नागरिक आणि NRI खरेदीदारांनी अधिक सावध राहावे**

परदेशात राहणारे भारतीय किंवा ज्येष्ठ नागरिक अनेकदा ऑनलाईन व्यवहारांवर अधिक अवलंबून असतात. त्यामुळे ते फसवणुकीचे सोपे लक्ष्य ठरू शकतात. अशा खरेदीदारांनी–

✻ विश्वासू नातेवाईक किंवा अधिकृत प्रतिनिधीमार्फत प्रत्यक्ष साइट पाहावी.

✻ व्हिडिओ कॉलवरच व्यवहार निश्चित करू नये.

✻ सर्व कागदपत्रांची स्वतंत्र कायदेशीर तपासणी करून घ्यावी.

✻ मोठी रक्कम टप्प्याटप्प्याने आणि अधिकृत माध्यमातूनच अदा करावी.

**✻ सोशल मीडियावरील प्रभावशाली व्यक्तींच्या (Influencers) प्रचाराकडे विवेकाने पाहा**

आज अनेक प्रकल्पांचा प्रचार युट्यूब, इन्स्टाग्राम किंवा फेसबुकवरील इन्फ्लुएन्सर्समार्फत केला जातो. त्यांच्या व्हिडिओमुळे एखादा प्रकल्प आकर्षक वाटू शकतो; मात्र प्रचार आणि वस्तुस्थिती यामध्ये फरक असू शकतो.

कोणाच्याही शिफारशीवर नव्हे, तर स्वतःच्या पडताळणीवर विश्वास ठेवा.

**✻ सुरक्षित घरखरेदीचे १० सुवर्ण नियम**

✻ कोणतीही माहिती किमान दोन विश्वासार्ह स्रोतांमधून पडताळा.

✻ बाजारभावापेक्षा खूप कमी किंमत दिसल्यास कारण जाणून घ्या.

✻ प्रत्यक्ष साइटला भेट दिल्याशिवाय अंतिम निर्णय घेऊ नका.

✻ सर्व आर्थिक व्यवहार अधिकृत बँक खात्यातूनच करा.

✻ प्रत्येक व्यवहाराची लेखी पावती घ्या.

✻ RERA आणि इतर आवश्यक नोंदी तपासा.

✻ करार पूर्ण वाचल्याशिवाय स्वाक्षरी करू नका.

✻ भावनिक दबावाखाली किंवा घाईत निर्णय घेऊ नका.

शंका असल्यास कायदेशीर किंवा आर्थिक तज्ज्ञांचा सल्ला घ्या.

प्रत्येक टप्प्यावर कागदपत्रे आणि डिजिटल पुरावे जतन करून ठेवा.

**लक्षात ठेवा...**

घराची किंमत लाखो रुपयांत असते; पण फसवणूक टाळण्यासाठी लागणारी सावधगिरी मोफत असते.

डिजिटल माध्यमांमुळे माहिती मिळवणे सोपे झाले असले, तरी योग्य निर्णय घेण्याची जबाबदारी अजूनही खरेदीदाराचीच आहे. कोणतेही तंत्रज्ञान विवेक, पडताळणी आणि कायदेशीर दक्षता यांची जागा घेऊ शकत नाही.

**निष्कर्ष :** ऑनलाईन घरशोध हा आजच्या काळातील वास्तव आहे आणि त्याचे अनेक फायदेही आहेत. मात्र आकर्षक छायाचित्रे, चमकदार जाहिराती किंवा मोठ्या सवलतींच्या आश्वासनांपेक्षा सत्य परिस्थिती, अधिकृत कागदपत्रे आणि प्रत्यक्ष पडताळणी यांवर विश्वास ठेवणे अधिक महत्त्वाचे आहे. घर खरेदी हा केवळ आर्थिक व्यवहार नसून आयुष्यभराच्या सुरक्षिततेशी आणि कुटुंबाच्या भविष्यासोबत जोडलेला निर्णय आहे. त्यामुळे प्रत्येक क्लिक विचारपूर्वक करा, प्रत्येक माहितीची खातरजमा करा आणि प्रत्येक व्यवहार पारदर्शक ठेवा. सजग खरेदीदारच सुरक्षित खरेदीदार ठरतो.

**ऑनलाईन माहिती तुम्हाला पर्याय दाखवते; पण योग्य पडताळणीच सुरक्षित निर्णय घेण्यास मदत करते. घराच्या स्वप्नाचा पाया केवळ सिमेंट आणि विटांवर नसतो, तर माहितीपूर्ण निर्णय, कायदेशीर खात्री आणि आर्थिक शिस्त यांवरही तो तितकाच मजबूत उभा असतो.**



**– इंजि. प्रकाश जैन,**
**सिव्हिल इंजिनिअर** RERA **व**
Re-Development Consultant
**१९९० पासून बिल्डर व डेव्हलपर म्हणून कार्यरत. रिअल इस्टेट,** RERA **आणि पुनर्विकास क्षेत्रातील ३० + वर्षांचा अनुभव.**
**आदर्श कन्सल्टन्सी**
O-1, **आदर्श समृद्धी अपार्टमेंट, चौपाटी कारंजा, अहिल्यानगर.**
**मो.९४२२२२०७६२, ८९७५११२३४५**

AESA
Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar

# मंथन परीक्षेत सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलचे यश



नगर – सेंट विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूलची विद्यार्थिनी कु. इशिता सतीश लोंढे राज्यस्तरावर ३१, सौमित्र सौरभ लिमयें २४, विराज नितीन शेवाळे ३८, अथर्व गणेश कदम ३८, साईश विकास जाधव ४५, स्वानंदी अजय महाजन ३१ व गर्वित भूषण भाटिया याने २४ क्रमांक पटकवात शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. प्रतिष्ठित मंथन परीक्षेतील या उल्लेखनीय यशामुळे शाळेच्या गुणवत्तेची परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

अभ्यासातील सातत्य, कठोर परिश्रम आणि शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनाच्या बळावर त्यांनी हे यश मिळविले. त्यांच्या या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका गीता तांबे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. कंचन पापडेजा, शिक्षकवृंद,

संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोदर माखिजा तसेच विश्वस्त महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरुनानी आणि हरेश मध्यान तसेच पालकांनी त्यांचे अभिनंदन करून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखणाऱ्या सेंट विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूलसाठी विद्यार्थ्यांचे हे यश निश्चितच अभिमानास्पद ठरले आहे.

# नगरमध्ये २२ ऑगस्टपासून अहिल्या सरस्वती महोत्सवाचे आयोजन

### ९ ऑगस्ट रोजी अहिल्यानगर फॅशन रनवेसाठी होणार मेगा ऑडिशन

नगर – नगरमध्ये महिला सक्षमीकरण आणि त्यांच्यातील कलागुणांना वाव देण्यासाठी अहिल्या सरस्वती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. २२ ते ३० ऑगस्ट या कालावधीत होणाऱ्या या महोत्सवात अहिल्यानगर फॅशन रनवे होणार आहे. यासाठी ९ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० ते दुपारी ३ या कालावधीत नवीन टिळक रोडवरील पॅराडाईज हॉटेल मागील नंदनवन लॉन्स येथे ऑडिशन होईल. प्रेग्नेंट लेडी वॉक, पॅरेंट ण्ड मी वॉक, डॉक्टर्स वॉक आणि ८ वेगवेगळे रनवे सिक्वेन्स यात असतील, अशी माहिती सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. अमोल जाधव यांनी दिली.

देशातील फॅशन विश्वातील अग्रगण्य फॅशन कार्निवलच्या वतीने कल्लाकार कट्टा फॅशन रनवेचे नियोजन करत आहे. त्यामुळे हा कार्यक्रमांतून देश पातळीवरील प्रचलित फॅशन ट्रेंड नगरमध्ये पहायला मिळतील. अहिल्यानगर फॅशन रनवे मध्ये १६ वर्षांपुढील मुली, महिला सहभागी होऊ शकतील. ऑडिशनसाठी काळा टँक टॉप, ४ किंवा ५ इंची रनवे हिल्स, निळ्या रंगाची डेनिम शॉर्टस किंवा कल लेंथ पँट असा ड्रेसकोड आहे. यासाठी मोफत प्रवेश असून नाव नोंदणीसाठी ९७३०२०८०९८ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा. फॅशन रनवेचा मुख्य इव्हेंट रविवार दि. ३० ऑगस्ट रोजी नवीन टिळक रोडवरील पराडाईज हॉटेल मागील नंदनवन लॉन्स येथे होईल.

सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलने नगरच्या सांस्कृतिक क्षेत्रात सातत्यापूर्ण योगदान देत महिलांना निखळ मनोरंजनाचा आनंद मिळण्यासाठी वेळोवेळी विविध उपक्रम राबविले आहेत. नगरमध्ये पहिल्यांदा प्रेग्नेंट लेडी फॅशन रनवे सरस्वती हॉस्पिटलनेच घेतला होता. आता प्रसिद्ध फॅशन कार्निवलच्या माध्यमातून कल्लाकार कट्टा हा भव्य फॅशन रनवे घेत आहे.

अहिल्या सरस्वती महोत्सवाला २२ ऑगस्ट पासून सुरुवात होईल. यादिवशी ताणतणाव, मानसिक स्वास्थ्य आणि जीवनशैलीविषयी मार्गदर्शन केले जाईल. २३ ऑगस्ट रोजी खास महिलांसाठी बाईक रॅली, आई व मी पोर्ट्रेट, माझ्या आयुष्यातील अहिल्या – ऑनलाईन व्हिडिओ स्पर्धा, कणखर महिला, आरोग्य जागृती कार्यक्रम होतील. ३० ऑगस्ट रोजी मेगा इव्हेंट होईल. यात फॅशन रनवे बरोबरच अहिल्या गौरव पुरस्कार, सरस्वती गौरव पुरस्कार वितरण, प्रेग्नेंट लेडी वॉक, डॉक्टर्स वॉक, पॅरेंट ण्ड मी वॉक, डिझायनर फॅशन सिक्वेन्स होईल. याशिवाय महिला सक्षमीकरणावर आधारित नृत्य नाट्य आविष्कार सादर केला जाणार आहे. टॅलेंट, फॅशन, सक्षमीकरण, आरोग्य, मनोरंजन आणि पुरस्कार असा सुरेख संगम असलेला हा महोत्सव मोठी पर्वणी ठरणार आहे. महोत्सवातील सर्व कार्यक्रमांना मोफत प्रवेश आणि सहभाग आहे. जास्तीत जास्त युवती, महिलांनी यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आचार्यश्रींच्या जयंतीनिमित्त लिटिल फ्लॉवर प्री स्कूलमध्ये आनंद चालिसा पाठ

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांची १२९ वी जन्म जयंती १३ ऑगस्ट रोजी साजरी होत आहे. यानिमित्त ६ ते १४ ऑगस्ट दरम्यान जन्म जयंती सप्ताह सुरू झाला आहे. या काळात दरवर्षी आनंदभक्त आठ दिवस उपवास (अट्ठाई) करत गुरूदेवांच्या चरणी सेवा अर्पण करतात. या भक्तीमय वातावरणात लहान मुलांमध्येही आध्यात्मिक संस्कार रूजावेत यासाठी लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या सारसनगर शाखेत आनंद चालिसा पाठ कार्यक्रम घेण्यात आला. मुलांनी अतिशय श्रद्धेने यात सहभागी होत गुरूदेवांचे गुणगान केले.

लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या संचालिका मनिषा बोगावत व विशाल बोगावत यांच्या मार्गदर्शनाखाली प्री स्कूलमध्ये क्रमिक शिक्षणाला भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि भक्तीची जोड देण्यात आली आहे. विविध सण उत्सव याठिकाणी एकत्र साजरे केले जातात. अहिल्या नगर ही आचार्य आनंदऋषीजी महाराज यांची जन्मभूमी तसेच कर्मभूमी आहे.




लिटिल फ्लॉवर प्री स्कूलमध्ये आनंद चालिसा पाठ करताना चिमुकले विद्यार्थी व शिक्षिका.

त्यांनी कायम मानवसेवा, दिनदुबळ्यांची सेवा करण्याची शिकवण दिली. ही शिकवण मुलांना समजावी यासाठी आनंदतीर्थ फाऊंडेशन द्वारे विविध शाळा, महाविद्यालयात आनंद चालिसा पाठ आयोजित करण्याचे आवाहन करण्यात आले. या आवाहनाला प्रतिसाद देत लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या सारसनगर शाखेत मुलांनी अतिशय उत्साहात आनंद चालिसा पाठ करून आचार्यश्रींचे जीवन कार्य समजून घेतले.

जैन धर्मात अतिशय पवित्र असलेल्या चातुर्मासात यंदा आचार्यश्रींचे सुशिष्य उपाध्याय श्री प्रविणऋषीजी महाराज अहिल्या नगरमध्ये विराजमान आहेत. आनंदधामच्या परिसरात त्यांच्या सान्निध्यात चातुर्मास होत असून दररोज प्रवचन तसेच धार्मिक कार्यक्रम होत आहेत. याठिकाणीही आचार्यश्रीजींच्या जन्मजयंतीनिमित्त विशेष आराधना सुरू झाली आहे.

याच आराधना पर्वात लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या चिमुरड्यांनी सहभागी होत भक्तीचा आनंद घेतला.

# केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले ९ ऑगस्टला अहिल्यानगर दौऱ्यावर

### कै. अशोक गायकवाड यांच्या शोकसभेला राहणार उपस्थित

नगर – केंद्रीय राज्यमंत्री तथा सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्री रामदास आठवले हे ९ ऑगस्ट रोजी अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून, शहरातील वृंदावन लॉन्स येथे आयोजित करण्यात आलेल्या रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ पदाधिकारी कै. अशोक गायकवाड यांच्या शोकसभेस ते प्रमुख उपस्थिती लावणार आहेत. दुपारी १.४५ वाजता ना. आठवले शोकसभेच्या ठिकाणी उपस्थित राहणार असल्याची माहिती रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले) जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांनी दिली.

कै. अशोक गायकवाड हे रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ व निष्ठावंत पदाधिकारी म्हणून दीर्घकाळ कार्यरत होते. त्यांनी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्यासोबत राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रात काम केले होते. पक्षाच्या संघटनात्मक बांधणीत तसेच सामाजिक चळवळीमध्ये त्यांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे साळवे यांनी सांगितले.

शोकसभा संपल्यानंतर दुपारी २.३० वाजता ना. आठवले हे अहिल्यानगर येथील शासकीय विश्रामगृहात समाजकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेणार आहेत. या बैठकीत सामाजिक न्याय व समाजकल्याण विभागाशी संबंधित विविध विषयांचा आढावा घेतला जाणार आहे.



राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत दमदार कामगिरी करणारे आनंद विद्यालयाचे विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक.

# अबॅकस स्पर्धेत आनंद विद्यालयाचे यश

नगर – एव्हरेस्ट अबॅकस अॅकॅडमीच्या वतीने कल्याण रोड येथील द्वारका लॉन्स येथे आयोजित करण्यात आलेल्या ५१ व्या राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेत आनंद विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. देशभरातील सुमारे २,५०० विद्यार्थ्यांच्या सहभागात पार पडलेल्या या पाच मिनिटांच्या स्पर्धेत आनंद विद्यालयाचा विद्यार्थी पार्थ भरत खेडकर याने तब्बल २३० गणिते अचूक सोडवत 'चॅम्पियन ऑफ द चॅम्पियन' हा सर्वोच्च किताब पटकाविला. त्याला आकर्षक ट्रॉफी, प्रशस्तीपत्र आणि रोख तीन हजार रुपयांचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. विशेष म्हणजे, स्पर्धेच्या आजवरच्या इतिहासात प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणात अचूक गणिते सोडविण्याचा विक्रम नोंदविला गेला आहे.

याच स्पर्धेत अथर्व कैलास बाबर याने १७१ अचूक गणिते सोडवून 'चॅम्पियन' होण्याचा मान मिळविला. तसेच शिवराज सचिन फाळके (१०३), विनिता महेश चिपोळे (९४), वेदांगी अभिजित भणगे (८१), रजत मयूर सुपेकर (७८), शिवांश गणेश शिंदे (७७), भूमिका भारत भवरे (७७), असद अन्सार पठाण (७२), सेजल रोहन बायस (६८), तनिष्का विनोद क्षीरसागर (५५), पवन सहदेव जांगिड (५२), विराज सनी जाधव (४६) आणि आयुष गोपाळ शिंदे (२६) यांनीही उल्लेखनीय कामगिरी करून विद्यालयाचे नाव उज्ज्वल केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा आनंद एज्युकेशन सोसायटीचे सचिव किसन तरटे, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका शारदा पोखरकर आणि प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक रवींद्र अष्टेकर यांच्या हस्ते ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी शिक्षक प्रतिनिधी स्वाती ननावरे यांनी विद्यार्थ्यांनी अबॅकस प्रशिक्षणाचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन केले. या यशामागे अबॅकस शिक्षिका नम्रता गांधी यांचे मार्गदर्शन लाभल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

### ऋषी परंपरेतील आनंदयात्री

# राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा.

***पावन श्रावणाच्या प्रथम शुभदिनी १३ ऑगस्ट रोजी आचार्य सम्राट पूज्य गुरुदेव आनंदऋषीजी म.सा. यांच्या जन्मजयंती निमित्त... यावर्षी आनंदधाम तीर्थ परिसरात भव्य समर्पण चातुर्मास सोहळा होत आहे. भारतभरातील करोडो लोकांचा नामजप स्मरण, ३-४ हजारोंची भक्तीपूर्वक अठाई इ. श्रद्धापूर्वक सुमनांनी गुरुदेवांच्या स्मृतीस वंदन होत आहे...***

आपला अहिल्यानगर जिल्हा ऐतिहासिक व साधुसंतांच्या पावन पदस्पर्शाने आणि वात्सल्याने पुनीत झालेला आहे. विश्वाला पसायदान मागणारे ज्ञानेश्वरी लिहिणारे संत ज्ञानेश्वर माऊली, मौनाचा महिमा देणारे अवतार मेहेरबाबा, शिर्डीत सर्वधर्म समभावाचा, श्रद्धा सबुरीचा संदेश देणाऱ्या साईबाबांसह नगर शहराला जैनीयांची अन् भाविकांची काशी बनवणाऱ्या राष्ट्रसंत आचार्यश्री आनंदऋषीजींची जन्म व कर्मभूमी.

श्रावणाच्या प्रथम शुभदिनी पिता देवीचंदजी आणि माता हुलसादेवी यांच्या धर्मपरायण, संस्कारी कुटुंबात गुरुदेवांचा जन्म झाला. त्यांना उत्तमकुमार नामक मोठा भाऊ व एक मोठी बहिण होती. लहानपणापासून कुटुंबाच्या धार्मिक वातावरणात वाढलेल्या नेमीचंद (नेमीकुमार) यांच्या चिचोंडी या जन्मगावी महान संतरत्न श्री रत्नऋषीजी म.सा. यांचा चातुर्मास होता. (रत्नऋषिजी हे कवीकुलभूषण पू. श्री तिलोकऋषीजी म.सा. यांचे सुशिष्य होते.) या रत्नपारखी रत्नऋषिजींनी आनंदऋषिजींचे (नेमीकुमार) गुण-प्रारब्ध हेरले. माता हुलसादेवींकडून अनोखी भिक्षा (गोचरी) म्हणून त्यांनी नेमीकुमारांना मागितले.



वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षी दिक्षा संपन्न होऊन नेमीकुमार आनंदऋषीजी झाले. युगद्रष्टा गुरुदेव रत्नऋषिजींनी या हिऱ्याला ज्ञानसाधना व धर्माचरणाचे कोंदण दिले. आनंदऋषीजी समर्पित भावनेने ज्ञानाभ्यास, जप, तप, आराधना करीत होते. आपल्या गुरुदेवांच्या देवलोकानंतर त्यांनी तप, स्वाध्यायात स्वत:ला अधिकच वाहून घेतले. विशेषत: आयंबिल तपसाधनेवर त्यांची विशेष आस्था होती. आहाराप्रती आसक्ती कमी झाली तर ज्ञान व आत्मसाधना करणे सोपे जाते असे ते म्हणायचे. आजही त्यांच्या स्मरणार्थ शेकडो, हजारो श्रावक मीठ, मिरची, तेल नसलेल्या भोजनाचे आयंबिल करतात.

आचार्यश्री आनंदऋषीजींच्या ज्ञान तपस्येबद्दल किती सांगावे संस्कृत-प्राकृतसह त्यांनी सांख्यदर्शन, वैदिक दर्शन, बौद्ध दर्शन, ब्रम्हसूत्र, शंकर भाष्य, उपनिषद, महाभारत, गिता, रामायण इ. चा सखोल अभ्यास केला. त्यांचा भावार्थ समजून घेतला. जाणिवांच्या कक्षा सहजता, शालीनता तर एवढी की ऊर्दू शिकवण्यास येणाऱ्या मुस्लीम शिक्षकापुढेही ते विद्यार्थीसम वागायचे. हळूहळू प्राचीन ऋषीमुनींच्या प्रवचने, उपदेशांच्या प्रवाहात त्यांनी स्वत:ला सामावून घेऊन ही ऋषी परंपरा समृद्ध केली.

जैन धर्मीयात अनेक पंथ, संप्रदाय स्वत:चे वेगवेगळे अस्तित्व ठेवतात. काळानुरुप सर्वांनी एकत्र यावे संघटन (निदान प्रथमत: साधुसंतांचे) मजबूत व्हावे या व्यापक विचारांनी ते कार्यरत राहिले. त्यासाठी भारतभ्रमण करताना त्यांनी १९४९ मध्ये राजस्थानच्या ब्यावर येथे ९ (नऊ) संप्रदायांच्या साधु व श्रावकांना एकत्र आणले. बरेच विचारमंथन झाल्यावर ५ संप्रदायांनी एक आचारसंहिता तयार करुन गुढीपाडव्याच्या शुभदिनी 'श्री वीर वर्धमान श्रमण संघ' स्थापन केला. तसेच १९५२ च्या सादडी साधु संमेलनात ज्येष्ठ श्रावकांच्या मदतीने 'श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघची' स्थापना होऊन आनंदऋषीजी त्याचे प्रधानमंत्री, उपाध्याय प्रवर बनले.

धर्म प्रभावनेचे त्यांचे कार्य पूर्ण बहरत असतानाच १९६४ च्या अजमेरच्या ज्येष्ठ श्रेष्ठ साधुंच्या संमेलनात त्यांना श्रद्धापूर्वक आचार्यश्री पदाची चादर दिली गेली. धर्म व समाजासाठी समर्पित त्यांच्या जीवनात काही कटु प्रसंगही आले होते. विषाची परीक्षा देणारेच महापुरुष बनतात. धर्म संघटन व जैन समाजासाठी त्यांनी निरंतर आयुष्य वेचले.

ज्ञानवंत समाज व साधु परिवारासाठी त्यांनी उभारलेले श्री तिलोकरत्न जैन धार्मिक परीक्षा बोर्ड, धर्मप्रभावनासाठी १९८१ मध्ये राहत्यात स्थापिलेले अ.भा. वर्धमान स्थानकवासी जैन स्वाध्याय संघ त्यांच्या दूरदृष्टीचे दीपस्तंभ ठरतील. २८ मार्च १९९२ रोजी त्यांचे संथाराव्रतात महानिर्वाण झाले. आता त्यांचे सर्व शिष्य व भाविक त्यांचे कार्य अजून नेत आहेत. त्यांनी फुलवलेली धर्मबाग आपण अधिक पुढे न्यायची आहे. त्यांच्या पवित्र स्मृतीस वंदना करताना म्हणावेसे वाटते. ''किसी को नही था उनके कद का अंदाज। वो आसमाँ था लेकिन झुककर चलता था।।

– **किशोर गांधी** (दिशान फिचर्स)

# निरामय

## मधुमेह आता तरुणांतही



आरोग्य विशेष


डॉ. कुंदन गायकवाड

मधुमेह हा जगभरात वेगाने वाढणारा आजार आहे. पूर्वी हा आजार वृद्धापकाळातील आजार मानला जात होता. परंतु गेल्या दहा वर्षांत मुले आणि तरुणांनाही या आजाराची लागण होत आहे. सर्वात मोठी समस्या म्हणजे लोकांना या आजाराची लक्षणे माहित नाहीत. हा आजार गंभीर झाल्यावरच कळतो.

अमेरिकन 'सीडीसी'च्या राष्ट्रीय मधुमेह स्थिती अहवालानुसार ३८ दशलक्ष अमेरिकन लोकांना (सुमारे ११.६ टक्के) मधुमेह आहे. यापैकी २० टक्के लोकांना स्वतःला हा विकार असल्याचे माहीत नाही. कारण लोकांना त्याची लक्षणे माहीत नाहीत. मधुमेहाचा शरीरातील इन्सुलिनच्या पातळीवर परिणाम होतो. मधुमेहामागे अनुवंशिकता किंवा चुकीची जीवनशैलीही कारणे असतात. मधुमेह झाल्यावर शरीरात इन्सुलिनचे उत्पादन आणि वापर प्रभावित होतो. त्याचा परिणाम संपूर्ण शरीरावर होतो.

मधुमेह कोणत्याही वयात होऊ शकतो. कुटुंबातील एखाद्याला मधुमेह असेल तर तो होण्याची शक्यता खूप जास्त असते. या आजारापासून बचाव करण्यासाठी त्याच्या लक्षणांबद्दल माहिती असणे खूप महत्वाचे आहे. मधुमेहाच्या सुरुवातीच्या लक्षणांमध्ये थकवा, वारंवार लघवी होणे आणि जास्त तहान लागणे यांचा समावेश आहे. यात रात्री लघवीची समस्या जास्त असते आणि रात्री जास्त तहान लागते. दिवसाही दर अर्ध्या तासाने लघवी करण्याची इच्छा असते. तथापि ते व्यक्तीपरत्वे अवलंबून असते. काही लोक दिवसातून फक्त दोन किंवा तीन वेळा आणि रात्री अनेक वेळा लघवी करतात, तर काही लोक दिवसा जास्त वेळा लघवी करतात. परंतु मधुमेहाच्या रुग्णांमध्ये ही तीन लक्षणे सामान्य आहेत. त्यांच्याकडे दुर्लक्ष करू नये. मधुमेहाची सुरुवातीची लक्षणे जाणवल्यावर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. डॉक्टर तुमच्या शरीरातील साखरेची पातळी तपासण्यासाठी एक चाचणी लिहून देतील. ही चाचणी करून घ्या आणि साखरेची पातळी जास्त असेल तर तुम्ही दिनचर्या आणि आहार यात बदलकरा. तुम्ही साखरयुक्त पदार्थांपासून दूर राहिले पाहिजे. दिवसातून किमान १५ मिनिटे वेगाने चालावे.

## लग्नापूर्वी करा या चाचण्या




जागरूक बना

डॉ. मेघा दळे

लग्न हा स्त्री आणि पुरुष दोघांच्याही आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा टप्पा असतो. प्रेम, समज आणि विश्वासासोबत आरोग्याचीही भर पडली तर हे बंधन अधिक मजबूत होते. लग्नाच्या तयारीत बरेचदा लोक कपडे, दागिने, छायाचित्रण आणि सजावटीवर लक्ष केंद्रित करतात. परंतु सर्वात महत्त्वाच्या गोष्टीकडे म्हणजेच आरोग्याकडे लक्ष देत नाहीत. लग्नापूर्वी काही आवश्यक वैद्यकीय चाचण्या केल्याने भविष्यातील जीवन सुरक्षित होतेच, शिवाय अनेक संभाव्य आरोग्य समस्यांना आगाऊ प्रतिबंधदेखील होतो.

**✻ थॅलेसेमिया आणि अनुवांशिक चाचणी**

थॅलेसेमिया हा एक अनुवांशिक आजार आहे. तो दोन्ही पालकांकडून मुलाला होऊ शकतो. पती-पत्नी दोघेही त्याचे वाहक असतील, तर मुलाला गंभीर समस्या येऊ शकतात. म्हणून, लग्नापूर्वी थॅलेसेमिया मायनर चाचणी आणि इतर अनुवांशिक चाचण्या आवश्यक आहेत.

**✻ एचआयव्ही चाचणी**

एचआयव्ही, हिपॅटायटीस बी, हिपॅटायटीस सी, सिफिलीस आणि गोनोरियासारखे लैंगिक संक्रमित आजार आहेत का, याची तपासणी करणे महत्त्वाचे आहे. हे केवळ जोडीदाराच्या आरोग्यावरच परिणाम करू शकत नाहीत, तर गर्भधारणेवरही परिणाम करू शकतात.

**✻ प्रजनन चाचणी**

आजच्या धकाधकीच्या आणि धावपळीच्या जीवनात बरेच लोक प्रजननाशी संबंधित समस्यांना बळी पडत आहेत. लग्नापूर्वी, पुरुष आणि महिला दोघांनीही शुक्राणूंची संख्या आणि ओव्हुलेशन सायकल यासारख्या प्रजनन चाचण्या करून घेतल्या पाहिजेत.

**✻ रक्तगट आणि आरएच फॅक्टर चाचणी**

लग्नापूर्वी रक्तगट आणि आरएच फॅक्टरची माहिती असणे खूप महत्त्वाचे आहे. स्त्री आरएच निगेटिव्ह असेल आणि पुरुष आरएच पॉझिटिव्ह असेल तर गर्भधारणेदरम्यान समस्या उद्भवू शकतात. अशा परिस्थितीत डॉक्टर विशेष खबरदारी घेण्याचा सल्ला देतात. त्यामुळे भविष्यात समस्या टाळता येतील.

**✻ मधुमेह आणि थायरॉईड चाचण्या**

थायरॉईड आणि मधुमेहसारखे आजार आजकाल सामान्य झाले आहेत आणि त्यांचा गर्भधारणेवर, मूड स्विंग्ज आणि शारीरिक ऊर्जेवर खोलवर परिणाम होतो. म्हणून वेळेवरच त्यांची तपासणी करणे खूप महत्वाचे आहे.

**✻ मानसिक आरोग्य मूल्यांकन**

बरेचदा लोक मानसिक आरोग्य गांभीर्याने घेत नाहीत. परंतु लग्नानंतर ते तणाव आणि मतभेदांचे एक मोठे कारण बनू शकते. साधी मानसिक आरोग्य तपासणी केल्याने ती व्यक्ती नैराश्य, चिंता किंवा इतर कोणत्याही मानसिक आजाराने ग्रस्त तर नाही, हे जाणून घेण्यास मदत होऊ शकते. लग्नापूर्वी काही वैद्यकीय चाचण्या करणे केवळ शहाणपणाचेच नाही, तर एक जबाबदारीदेखील आहे. हे तुम्हाला निरोगी जीवनाकडे घेऊन जातेच, शिवाय तुमच्या नात्यात एक नवीन प्रामाणिकपणा आणि विश्वासाचा पायादेखील घालते.

## मानेवरचा काळेपणा आजाराचे लक्षण



जाणून घ्या


डॉ. रमेश कोठारी

अनेकदा मानेवरील काळेपणा हा घाण साचल्यामुळे, तसेच अनेक महिला किंवा मुली खोटे मंगळसूत्र किंवा खोट्या साखळ्या घालत असल्यामुळे त्यांच्या गळ्यावर काळेपणा येतो, असा अनेकांचा समज आहे, पण हे चुकीचे आहे. मात्र, एखाद्या आरोग्य समस्येमुळे हा त्रास होतो. मानेच्या काळेपणाला 'अकॅन्थोसिस नायग्रिनेक्स' म्हणतात.

मान काळी पडण्याची अनेक कारणे असू शकतात. इन्सुलिन प्रतिरोध, पीसीओएस, हार्मोनल असंतुलन, लठ्ठपणा किंवा कधीकधी अनुवांशिकता अशी वेगवेगळी कारणे आहेत. ही समस्या दूर करण्यासाठी वजन नियंत्रण, इन्सुलिन प्रतिरोधकतेवर उपाय आणि 'पीसीओएस' किंवा 'पीएमओएस'चे व्यवस्थापन करणे फायदेशीर ठरेल.

मानेच्या काळेपणाच्या समस्येला दूर करण्यासाठी घरगुती उपाय करण्यापेक्षा त्वचारोगतज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. तुम्ही केमिकल पील किंवा लेझर उपचाराने ही समस्या सोडवू शकता. या समस्येच्या मुळाशी जाण्यासाठी काही चाचण्या करू शकता. त्याचबरोबर उपाशीपोटी रक्तातील साखरेची आणि उपाशीपोटी इन्सुलिनची चाचणी करू शकता.

## कानाच्या आतील आजार



व्याधी विचार


डॉ. प्रसन्न नेने

अनेकदा अचानक बसल्याबसल्या डोके गरगरणे, जणू संपूर्ण जग फिरत आहे, असे वाटते. त्याचबरोबर कानात शिट्टी किंवा घंटा वाजल्यासारखा आवाज येतो. काही वेळा एका कानाने ऐकू येणेही कमी होते. ही लक्षणे वारंवार दिसत असतील, तर ती कानाच्या आतील भागाशी संबंधित 'मेनियर्स डिसिज' या गंभीर आजाराचे संकेत असू शकतात.

अमेरिकेतील वैद्यकीय तज्ज्ञांच्या मतानुसार कानाच्या आत एक अतिशय सूक्ष्म आणि गुंतागुंतीची यंत्रणा असते. ती शरीराचा समतोल राखण्याचे काम करते. आपल्या कानाच्या आतील भागात एक विशिष्ट प्रकारचा द्रव भरलेला असतो. काही कारणांमुळे या द्रवाचे प्रमाण किंवा दाब वाढल्यास कानाचा समतोल बिघडतो. या स्थितीला 'मेनियर्स डिसिज' म्हणतात. हा आजार प्रामुख्याने एका कानावर परिणाम करतो आणि साधारण ४० ते ६० वर्षे वयोगटातील व्यक्तींमध्ये अधिक आढळून येतो.

तीव्र चक्कर येणे, कानात घंटानाद किंवा विचित्र आवाज ऐकू येणे, ऐकण्याची क्षमता कमी होणे, कानात जडपणा किंवा दाब जाणवणे अशी लक्षणे दिसल्यास त्वरित डॉक्टरांकडे जाऊन तपासणी करावी. योग्य औषधे व जीवनशैलीतील बदल यांच्या मदतीने रुग्णाला फायदा होतो. या आजारावर सखोल स्वरुपाचे संशोधन सुरू आहे. काही अहवालही प्रसिद्ध होत आहेत.

## महिलांमध्ये वाढताहेत 'हे' आजार




आरोग्य चर्चा

डॉ. दीप्ती नेने

आजच्या धावपळीच्या जीवनात महिला अनेकदा स्वतःकडे लक्ष देत नाहीत. त्यामुळे त्यांना अनेक आजारांना सामोरे जावे लागते. मग हे छोटे आजार हळूहळू मोठ्या आजाराचे रूप धारण करतात. अशा परिस्थितीत महिलांना जागरूक करण्याची गरज आहे.

**✻ स्तनांचा कर्करोग**

हा महिलांमध्ये सर्वात सामान्य आजार बनला आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, गेल्या काही वर्षांत या आजारामुळे सहा लाखांहून अधिक महिलांचा मृत्यू झाला आहे. हा कर्करोग स्तनाच्या उतींमध्ये होतो. स्तनात वाढणाऱ्या पेशी ट्यूमरचे रूप धारण करतात. वेळेवर उपचार केल्यास तो बरादेखील होऊ शकतो.

**✻ गर्भाशयाचा कर्करोग**

हादेखील महिलांमध्ये एक सामान्य कर्करोग आहे. हा गर्भाशयाच्या मुखाच्या थरात वाढणारा कर्करोग आहे. हा महिलांमध्ये 'एचपीव्ही' मुळे होतो. यामुळे २०२२ मध्ये तीन लाखांहून अधिक मृत्यू झाले आहेत.


**✻ संधिवात**

महिलांमध्ये वाढत्या वयानुसार संधिवाताचा धोका वाढतो. या आजाराचे १०० हून अधिक प्रकार आहेत. हा आजार सांधेदुखी, सूज, कडकपणा यामुळे होतो.

**✻ ॲनिमिया**

जागतिक आरोग्य संघटनेनुसार, महिलांमध्ये ॲनिमिया सर्वात जास्त आढळतो. शरीराच्या अवयवांमध्ये ऑक्सिजन पोहोचवण्यासाठी पुरेसे हिमोग्लोबिन नसल्यास असे होते. जर त्यावर वेळेवर उपचार केले नाहीत तर ते प्राणघातक ठरू शकते. महिला या आजारांकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे हे आजार अधिक धोकादायक बनतात.

## प्रदूषणाचा फटका बाळांच्या वाढीला



आरोग्य चर्चा

डॉ. मेघा दळे


प्रदूषित हवेचा थेट फटका गर्भातील बाळाच्या वाढीला बसत असल्याचे धक्कादायक वास्तव दिल्लीतील 'एम्स'च्या एका संशोधनातून पुढे आले आहे. प्रदूषण बाळाच्या नैसर्गिक विकासात अडथळा आणते. याचे दुष्परिणाम जन्मानंतरही अनेक वर्षांपर्यंत बाळावर दिसतात. त्यामुळे आता प्रदूषण गर्भातील बाळाच्या मुळावर उठल्याचे चित्र आहे. प्रदूषणामुळे मानवी शरीरावर अनेक परिणाम होत असल्याचे अनेक अभ्यासातून पुढे आले आहे. मात्र, या प्रदूषणापासून आता गर्भातील बाळही सुरक्षित नाही, असे 'एम्स'ने नुकत्याच केलेल्या एक अभ्यासातून पुढे आले. 'ईएमबीओ मॉलिक्युलर मेडिसिन' आणि 'नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन'च्या जर्नलमध्ये प्रकाशित या अभ्यासाच्या निष्कर्षातून आलेल्या माहितीप्रमाणे हवेतील 'पीएम २.५' आणि 'पीएम १०'सारखे अतिसूक्ष्म घातक प्रदूषित कण थेट गर्भाशयातील प्लासेंटापर्यंत पोहोचत आहेत.

अतिप्रदूषित दिल्ली आणि झारखंडमधील कमी प्रदुषित देवघर येथील ९९४ प्रसूतींचे विश्लेषण केले गेले. ज्या महिला जास्त वेळ पीएम २.५ कणांच्या संपर्कात आल्या, त्यांच्या पोटी कमी वजनाची बाळे जन्माला येण्याचा धोका सर्वाधिक असल्याचे दिसून आले.

पीएम २.५ हे हवेमध्ये तरंगणारे अतिसूक्ष्म कण आहेत. त्यांचा व्यास २.५ मायक्रोमीटर किंवा त्यापेक्षा कमी असतो. हे कण मानवी केसांच्या जाडीपेक्षा सुमारे तीस पटीने लहान असतात. हे कण वाहनांमधून निघणारा धूर कारखान्यांमधून बाहेर पडणारे विषारी घटक, कचरा जाळणे आणि धुळीच्या कणांमुळे हवेत मिसळतात. अत्यंत लहान आकारामुळे, श्वासोच्छवासाद्वारे हे कण थेट फुप्फुसांमध्ये खोलवर जातात आणि रक्तप्रवाहातही प्रवेश करू शकतात. यामुळे दमा, हृदयविकार आणि श्वसनाचे गंभीर आजार होतात. आता हे कण थेट गर्भाशयापर्यंत जात असल्याचे आढळून आले. जागतिक आरोग्य संघटनेनुसार सुरक्षित हवेमध्ये पीएम २.५ ची पातळी प्रति घनमीटर १२ मायक्रोग्रॅम पेक्षा कमी असावी; मात्र प्रदूषित हवेत याची घनता कमालीची वाढलेली दिसते. गर्भवती महिलांबाबत 'एम्स' मध्ये जो अभ्यास झाला, त्यातून आणखी धक्कादायक माहिती पुढे आली आहे.

'एम्स'च्या संशोधनात असे आढळले, की गर्भवती महिला प्रदूषित हवेच्या संपर्कात येते, तेव्हा हे सूक्ष्म कण शरीरात सूज आणि 'ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस' वाढवतात. यामुळे गर्भाच्या आणि प्लासेंटाच्या वाढीसाठी अत्यंत आवश्यक असलेले प्रोटीन्स कमी होतात. त्याने बाळाला मिळणाऱ्या पोषण आणि ऑक्सिजनच्या पुरवठ्यात अडथळा निर्माण होतो. प्रदूषणाने महिलांमध्ये 'प्रीक्लेम्पसिया'चा म्हणजे गर्भावस्थेतील उच्च रक्तदाबचा धोकाही वाढल्याचे दिसले.

## चयापचय क्रियेचा वेग वाढवण्यासाठी...



काय खावं?

वजन कमी करण्यासाठी चयापचय क्रियेचा वेग वाढवणं गरजेचं असतं. चयापचय क्रियेचा वेग वाढला तरच वजन लवकर कमी होतं. काही पदार्थांच्या पोषक घटकांच्या सेवनामुळे चयापचय क्रियेचा वेग वाढू शकतो. कोणते आहेत हे पदार्थ? जाणून घेऊ.

✻वजन कमी करण्यासाठी प्रथिनयुक्त आहार घेण्यावर भर दिला जातो. प्रथिनांमुळे पोट बराच काळपर्यंत भरलेलं राहतं आणि आपण कमी खातो. प्रथिनांमुळे चयापचय क्रियेचा वेग वाढतो. मात्र प्रथिनयुक्त आहार घेण्यासोबतच नियमित व्यायाम करणंही गरजेचं आहे.

✻ कॉफीमुळेही चयापचय क्रियेचा वेग वाढतो. काही अभ्यासांमधून ही बाब समोर आली आहे. एकापेक्षा अधिक कप कॉफी पिणाऱ्यांचं वजन वेगाने कमी झाल्याचं काही संशोधनांमधून सिद्ध झालं आहे. मात्र कॉफीचं सेवन करण्याआधी डॉक्टरांचा सल्ला घ्यायला विसरू नका.

✻ डाळी आणि कडधान्यांमधून भरपूर प्रथिनं मिळतात. यात फायबरचं प्रमाणही बरंच जास्त असतं. यामुळे पोट बराच काळ भरलेलं राहतं. शिवाय चयापचय क्रियेचा वेगही वाढतो.

✻ ॲपल सिडर व्हिनेगार खूपच उपयुक्त पदार्थ आहे. याच्या सेवनाने वजनवाढीला मदत मिळते. तसंच या व्हिनेगारचे इतरही लाभ आहेत. पाण्याच्या ग्लासमध्ये दोन चमचे ॲपल सिडर व्हिनेगार घालून पिता येईल. यामुळे चयापचय क्रियेचा वेगही वाढतो.

✻ वजन कमी करण्यासाठी भरपूर पाणी प्यायला हवं. पाण्यामुळे चयापचय क्रियेचा वेगही वाढतो. त्यामुळे दिवसभरात दोन ते अडीच लीटर पाणी प्यायला हवं.

## सौंदर्य खुलवणारे आयुर्वेदिक उपचार



आयुर्वेद आणि विकार

नववधूने सुंदर आणि आकर्षक दिसणं गरजेचं असतं. चेहऱ्याचं सौंदर्य खुलवण्यासाठी मुली ब्युटी पार्लरमध्ये जातात. महागडी फेशियल तसंच इतर उपचार करून घेतात. काहीजणी कॉस्मेटिक सर्जरीचा पर्यायही निवडतात. मात्र आयुर्वेदिक उपचारांमुळे तुमचं नैसर्गिक सौंदर्य खुलतं. हे उपचार सुरक्षितही असतात. आयुर्वेदिक उपचार पद्धतींमुळे त्वचेवर कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत. लग्नाआधी मुली काही आयुर्वेदिक उपचार करून घेऊ शकतात. त्याविषयी...


✻ शिरोधारा या उपचारपद्धतीत कपाळावर हळूवार तेल सोडलं जातं. यामुळे शरीराला नवी ऊर्जा मिळते. या माध्यमातून शरीराची शुद्धी केली जाते. यानंतर आयुर्वेदिक तेलांनी शरीराला मसाज केला जातो. यामुळे शरीरातली सगळी नकारात्मकता दूर होऊन मानसिक शांतता लाभते.

✻ आयुर्वेदानुसार घामामुळे शरीरातली सगळी विषद्रव्यं निघून जातात. म्हणूनच आयुर्वेदिक स्टीम बाथ खूपच उपयुक्त ठरतो. या उपचारांसाठी तुम्हाला लाकडी खोक्यात झोपवलं जातं. इथे शरीराला औषधी वाफ दिली जाते. या वाफेतले औषधी घटक शरीरात शोषले जातात. शरीराला घाम येतो. या घामावाटे शरीरातले विषारी घटक बाहेर टाकले जातात. यामुळे चेहऱ्याला आणि त्वचेला नैसर्गिक तजेला मिळतो. त्वचा छान चमकदार दिसू लागते. यामुळे शरीराची लवचिकताही वाढते.

✻ औषधी वनस्पतींपासून तयार केलेला लेप शरीराला लावला जातो. या उपचारपद्धतीला लेपम असं म्हटलं जातं. हळद आणि चंदनयुक्त लेपामुळे त्वचा टवटवीत दिसू लागते.

नवसंशोधन

### आहारावर बंधनं असल्यास...



विविध आजार तसंच वजन कमी करण्यासाठी अनेकांच्या आहारावर बंधनं येतात. मात्र आहारावरच्या या बंधनांमुळे माणसाला एकटं वाटू शकतं. आहारावर बंधनं आल्यानंतर इतरांसोबत मनसोक्त खाता येत नाही. यामुळे एकटेपणा जाणवतो. इतरांनी ताटात घेतलेले पदार्थ आपल्यालाही ताटात घेता येत नसल्यामुळे आयुष्यात उणीव जाणवते, असं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. सात संशोधनं आणि पुरेशा प्रयोगाअंती याबाबतचे निष्कर्ष पर्सनॅलिटी अँड सोशल सायकोलॉजी या जर्नलमध्ये प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

काळजी डोळ्यांची

### का सुजतात डोळे?



लेझी आय किंवा ॲम्ब्लिओपिया हा लहान मुलांमध्ये आढळणारा नेत्रविकार आहे. यात मुलांच्या एका डोळ्याची दृष्टी दुसऱ्या डोळ्याच्या तुलनेत कमकुवत असते. म्हणजेच तिचा पुरेसा विकास होत नाही. लेझी आयकडे दुर्लक्ष करू नये. ही गंभीर समस्या आहे आणि यामुळे भविष्यात काही गंभीर समस्या जाणवू शकतात. लेझी आयची समस्या असणाऱ्या डोळ्याने पाहिलेल्या गोष्टी मेंदूपर्यंत पोहोचत नाहीत. त्यामुळे मुलांच्या हालचाली मंदावू शकतात. शिवाय भविष्यात कायम स्वरुपी दृष्टीदोष निर्माण होऊ शकतात. त्यामुळे लेझी आयवर तातडीने उपचार करून घ्यायला हवेत.

काळजी केसांची

### केसांना द्या तुपाचा मसाज



सध्या केसांच्या आरोग्याशी संबंधित ट्रेंड पहायला मिळतो आहे. यात केसांना तुपाने मसाज करण्याचं प्रमाण वाढलं आहे. मसाज केल्यामुळे स्कॅल्प आणि केस दोहोंनाही आराम मिळतो. तुपामुळे केसांच्या मुळांना बळकटी मिळते आणि यामुळे केसांची चांगली वाढ होते. यामुळे केस मजबूत तर होतातच शिवाय केसांची गळतीही कमी होते. शुद्ध तुपामुळे केसांना ओलावा मिळतो. तुपाने मसाज केल्यास केसांचा कोरडेपणा कमी होतो. त्यामुळे तेलाऐवजी तुपाने मसाज करता येईल.

आजीबाईचा बटवा

### लाभ आवळ्याचे



आवळा हे अत्यंत गुणकारी आणि आरोग्यदायी असं फळ आहे. आवळा हिवाळ्यात मोठ्या प्रमाणात मिळतो. त्यामुळे या दिवसात आवळा खायला हवा. आवळ्यात 'क' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असतं. 'क' जीवनसत्त्वामुळे शरीराला बळ मिळतं. रोगप्रतिकारक शक्ती वाढते. थंडीत सर्दी, खोकला, ताप असे आजार त्रास देतात. त्यामुळे 'क' जीवनसत्त्व मिळवण्यासाठी आवळा खूपच उपयोगी पडू शकतो. मधुमेहींनी आवळा खायला हवा. आवळ्यामुळे रक्तातली शर्करा नियंत्रणात राहते. कोलेस्टरॉलची पातळी कमी करण्यात आवळा महत्त्वाची भूमिका बजावतो. आवळ्याच्या सेवनाने वजन कमी व्हायलाही मदत होते.

# आनंदऋषीजी हॉस्पीटल हे गरीब - गरजू रुग्णांकरीता एक वरदान

## उद्योजक अजित बोथरा यांचे प्रतिपादन; दंतरोग तपासणी व उपचार शिबारात २५० रुग्णांची तपासणी

नगर – सातत्याने आनंदऋषीजी हॉस्पिटल गरीब – गरजू रुग्णांकरीता मोफत शिबीरे घेतात, त्यामुळे रुग्णांकरीता हे एक वरदान ठरत असून ही समाजाच्या दृष्टीने एक चांगली बाब आहे. समाजातील दु:ख निवारण्याचे काम जैन सोशल फेडरेशनच्या माध्यमातून हॉस्पिटलच्यावतीने होत आहे. बोथरा परिवाराचा हॉस्पिटलच्या स्थापनेपासून सहभाग आहे आरोग्याच्या या कार्यात बोथरा परिवार सहभागी असल्याचा मनस्वी आनंद होत आहे.या कार्याची व्याप्ती आणखी वाढून त्याचा जास्तीत जास्त गरजूंना लाभ व्हावा, यासाठी हॉस्पिटलने आता यापुढेही अशीच सेवा सुरु ठेवावी, असे प्रतिपादन उदयोजक अजित बोथरा यांनी केले.



आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आयोजित दंतरोग तपासणी व उपचार शिबिराचे उद्घाटन करताना उद्योजक अजित बोथरा, सौ. प्रतिभा बोथरा, अमन बोथरा, सौ.आकांक्षा बोथरा, सतिश बोथरा, सौ.पूर्वा कोठारी, चि.जैवीक कोठारी, संतोष बोथरा, माणकचंद कटारीया, सतीश लोढा, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, डॉ. अर्पणा पवार, डॉ. स्वराज ढोले, डॉ. अश्विनी बालगुडे, डॉ. तृप्ती डुंगरवाल, डॉ. प्रणव डुंगरवाल आदी. (छाया – उदय जोशी)

जैन सोशल फेडरेशन द्वारा संचलित श्री आनंद ऋषीजी हॉस्पिटल मध्ये राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या १२६ व्या जन्मदिनानिमित्त स्व. लखमीचंदजी बोथरा व स्व. सुशीलाबाई बोथरा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बोथरा परिवाराच्या वतीने आयोजित दंतरोग तपासणी व उपचार शिबिराचे उद्घाटन बोथरा परिवाराच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उद्योजक अजित बोथरा, सौ. प्रतिभा बोथरा, अमन बोथरा, सौ.आकांक्षा बोथरा, सतिश बोथरा, सौ.पूर्वा कोठारी, चि.जैवीक कोठारी, संतोष बोथरा, माणकचंद कटारीया, सतीश लोढा, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, डॉ. अर्पणा पवार, डॉ. स्वराज ढोले, डॉ. अश्विनी बालगुडे, डॉ. तृप्ती डुंगरवाल, डॉ. प्रणव डुंगरवाल आदी उपस्थित होते.

आकांक्षा बोथरा म्हणाल्या रूग्णसेवा हा एक यज्ञ असून तो सातत्याने चालविणे अवघड काम आहे हे अवघड शिवधनुष्य पेलण्याचे काम जैन सोशल फेडरेशनचे सर्व पदाधिकारी आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून सातत्याने करत आहे हे गौरवास्पद बाब आहे. समाजातील प्रत्येक घटकाला योग्य ती सेवा दिली जात आहे जे कार्य केले जाते पूर्ण श्रध्देने व निष्ठेने केले जात आहे. या कार्यात बोथरा परिवाराची पिढी सहभागी होत असल्याने सुख-समाधान-शांती लाभत असल्याचे सांगितले.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले की, हे सामाजिक कार्य अजून जोमाने करण्याचा मानस आहे. साामजिक बांधिलकीच्या माध्यमातून अत्याधुनिक मशिनरी व तज्ञ डॉक्टरांमार्फत कमी दरात रुग्णांना सेवा देण्याचा सातत्याने प्रयत्न हॉस्पिटलच्यावतीने सुरु असल्याचे सांगितले. बोथरा परिवार सारखे दानशूर व्यक्तीमुळेच हे शक्य झाले आहे आरोग्याच्या या यज्ञात बोथरा परिवार पुढची पिढी सहभागी झाली आहे.

डॉ. अर्पणा पवार म्हणाल्या दंतरोगात वेळेत उपचार घेणे गरजेचे आहे पुढे होणारे धोके त्यामुळे कमी होतात शिबिराच्या माध्यमातून अल्पदरात उपचार होणार आहेत अनेक प्रकारचे आधुनिक मशिनरी, सुपरस्पेशालिस्ट डॉक्टर यात सहभागी असल्याने तुमची योग्य ती काळजी घेतली जाते.

सुत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. सतीश लोढा यांनी आभार मानले.



## गुरुवाणी - १३
## इंद्रियांचे 'मालक' बना

जीभेला शांत ठेवले तर इतर सर्व इंद्रिये शांत होतात. जीभेला खूष कराल तर सर्वच इंद्रिये अशांत होतील. एका इंद्रियात इतके सामर्थ्य आहे की, जीवनाचा नाशही होतो आणि विकासही होतो. रसना (जीभ) बाहेरून रस घेते. आपल्या मनात पक्के बसलेले आहे की, बाहेरून रस घेतला तरच ऊर्जा मिळते. पण तीर्थंकर महावीर म्हणतात, बाहेरचा रस बंद केला तरच आत्मिक रसाचा आनंद मिळतो. भारतीय संस्कृतीने तप आणि संयमाची शिकवण दिली. पण आज जगात हिंसेच्या विकृतीला संस्कृती बनवली जात आहे. परिणामी आज मनुष्यच मनुष्याचा शत्रू बनला आहे. कुटुंबात कलह वाढलेत. जो आपले ऐकत नाही त्याचा द्वेष करायचा ही विकृती आहे. भारतीय संस्कृती प्रभू श्रीरामाची आहे. ज्यांनी वडीलांचे वचन पाळण्यासाठी हसतमुखाने वनवासही स्विकारला. गुरूदेवांचा जन्मोत्सव केवळ त्यांच्या प्रशंसेचा उत्सव नाही तर गुरूदेवांचे जीवनमूल्ये आत्मसात करण्याचा उत्सव आहे. त्यांच्या शिकवणुकीतून आपले जीवन उजळून निघावे यासाठी हा उत्सव आहे. आयंबिल तपावर गुरूदेवांची प्रचंड आस्था होती. कोणीही समस्या घेऊन गेल्यास गुरूदेव त्याला आयंबिल तप करण्याचा सल्ला द्यायचे. आयंबिल केल्यावर हजारो कुटुंबांना सकारात्मक अनुभव आलेत. गुरूदेवांच्या जन्मोत्सवात ९ वर्षांची लहान मुलेही अट्ठाई उपवास करत आहेत. किती प्रसन्न वातावरण गुरूदेवांच्या भूमीत तयार झाले आहे. जीभ दोन ठिकाणी काम बिघडवते. चुकीचे खाऊन पोट खराब करते आणि चुकीचे बोलून नात्यांमध्ये दुरावा आणते. खरं तर जीभ हे साधन आहे, त्याने सिद्धी केली पाहिजे. गुरुदेवांनी आपल्या इंद्रियांना 'ज्ञानेंद्रिये' बनवले. आपण जीभेला फक्त एकच काम दिले आहे. आवडीची चव मिळाली तर 'लाईक' करणे आणि न आवडते मिळाले तर 'डिसलाईक' करणे. जीभेला 'कर्मेंद्रिय' बनवले आहे. पिझ्झा, बर्गर, मसालेदार खाणारे, गुटखा खाणारे, दारू पिणारे आपल्या जीभेला, शरीराला, इंद्रियांना बरबाद करत आहेत. आपण आपल्या जीभेचे मालक आहोत की गुलाम याचा विचार करा. आपण आपल्या इंद्रियांचे मालक बनले पाहिजे. हेच आयंबिल तपाचे तत्व आहे.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# जिल्ह्यातील ७२ हजार ५५९ शेतकऱ्यांना कर्जमुक्ती योजनेचा लाभ

## शेतकऱ्यांच्या खात्यात ६९७ कोटी रुपये वर्ग; आधार प्रमाणीकरणामध्ये नगर जिल्हा राज्यात प्रथम : पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

नगर – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना ही राज्य शासनाची अत्यंत महत्वाकांक्षी योजनेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला असून, कर्जमुक्ती योजनेच्या ऑनलाईन लाभ वितरणास प्रारंभ होऊन पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील ७२ हजार ५५९ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ६९७.८१ कोटी रक्कम वर्ग करण्यात आल्याची माहिती जलसंपदा तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत दूरदृष्य प्रणालीद्वारे झालेल्या कर्ज वितरण शुभारंभास मंत्री विखे यांच्यासह जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मंगेश सुरवसे सहभागी झाले होते.

अहिल्यानगर जिल्ह्यातील ७२ हजार ५५९ शेतकऱ्यांच्या खात्यात ६९७ कोटी ८१ लाख २५ हजार १३९ रुपये एवढी रक्कम वर्ग करण्यात आली असल्याची माहिती पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली आहे.



राज्यातील शेतकरी हा राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा एक महत्वाचा भाग आहे. मात्र, अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी, महापूर यासारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे काही वेळेस पिकांचे नुकसान होते. त्यात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होते. त्यामुळे बाधित शेतकरी शेती कर्जाची मुदतीत परतफेड करू शकत नाही. असे शेतकरी थकबाकीदार झाल्यामुळे त्यांना बँकाकडून नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊ शकत नाही. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली होती. त्यानुसार जिल्ह्यातील ७२ हजार ५५९ शेतकऱ्यांच्या खात्यात ६९७ कोटी ८१ लाख २५ हजार १३९ रुपयांचा लाभ देण्यात आला. ही रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा करण्यात आली. यात अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ६५ हजार ६५६ शेतकरी सभासदांना ६२२ कोटी ७४ लाख रुपये एवढ्या कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे. तसेच अन्य राष्ट्रीयकृत बँकांमधील सहा हजार ९०३ शेतकरी सभासदांना ७५ कोटी ०७ लाख २५ हजार १३९ रुपये रकमेच्या कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे.

राज्य शासनाने सर्व बँकांना कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांना तातडीने खरीप पीक कर्ज उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत, जेणेकरून शेतकऱ्यांना नव्याने शेतीसाठी आर्थिक बळ मिळेल. पहिल्या यादीतील ज्या पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण अद्याप पूर्ण झालेले नाही, त्यांचे प्रमाणीकरण पूर्ण होताच त्यांच्या कर्जखात्यांवरही लाभाची रक्कम टप्प्याटप्प्याने हस्तांतरित करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील उर्वरित शेतकऱ्यांनीही आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, या योजनेत जिल्ह्यातील एकूण २ लाख ३३ हजार ७११ शेतकरी खातेदारांची माहिती शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. पहिल्या यादीत १ लाख ३२ हजार ५९१ पात्र शेतकऱ्यांच्या समावेश आहे. त्यापैकी १ लाख १५ हजार ६९२ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेले आहे. त्यामुळे उर्वरित शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार प्रमाणिकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. ८ हजार ३६३ शेतकऱ्यांनी अद्यापही फार्मर आयडी काढलेला नाही अशा शेतकऱ्यांनी तात्काळ फार्मर आयडी काढावा तसेच जे मयत खातेदार आहेत अशा खात्यांच्या बाबतीत त्यांच्या वारसाने विकास संस्थेकडे, बँकेकडे वारसाची नोंद लावून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी केले आहे.

# झेंडीगेट येथे १० ऑगस्ट रोजी एनसीएमसी स्मार्ट कार्ड शिबिर

नगर – महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) प्रवाशांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या एनसीएमसी स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन १० ऑगस्ट रोजी दर्शक प्रेस, झेंडीगेट पोलीस चौकीसमोर, झेंडीगेट, अहिल्यानगर येथे सकाळी १०.३० ते दुपारी ३.०० या वेळेत आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये प्रवाशांना एनसीएमसी स्मार्ट कार्डची नोंदणी व कार्ड मिळण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या कार्डद्वारे सुरक्षित व जलद डिजिटल पेमेंटसह महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी व दिव्यांग प्रवाशांना विविध प्रवास सवलतींचा लाभ घेता येणार आहे. अधिक माहितीसाठी शेख अयान (९२२५३२३५३५) व आदिल शेख (७६६६६०२६६०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पेमराज सारडा महाविद्यालयात डेटा सायन्स व कॉम्प्युटर सायन्स या नव्या कोर्सला मान्यता

नगर – पेमराज सारडा महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून बी.एस्सी डेटा सायन्स व एम.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स या रोजगाराभिमुख पदवी अभ्यासक्रमांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची मान्यता मिळाली आहे. विद्यार्थ्यांना संगणक व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील करियरसाठी उच्च दर्जाचे शिक्षण आता नगरमध्येच सहज उपलब्ध होणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी दिली.

उपप्राचार्य मिलिंद देशपांडे म्हणाले की, आजच्या डिजिटल युगात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. बी.एस्सी डेटा सायन्स अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रोग्रामिंग, सॉफ्टवेअर डेव्हलप, वेब डिझाईन, डेटा बेस मॅनेजमेंट, कृत्रिम बुद्धिमत्ता अशा विविध आयटी क्षेत्रातील आधुनिक कौशल्याचे शिक्षण मिळणार असून आहे. रोजगार व उद्योजकतेच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. या कोर्स साठी १२वी उत्तीर्ण आर्ट्स, कॉमर्स, सायन्स अशा कोणत्याही शाखेचा विद्यार्थी प्रवेश घेवु शकतो. सारडा महाविद्यालयात अनुभवी तज्ज्ञ प्राध्यापक, सुसज्ज ग्रंथालय व अद्ययावत संगणक लॅब व सर्व सोयीसुविधा उपलब्ध आहेत.

हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा यांनी याबाबत मोठे समाधान व आनंद व्यक्त केला आहे. संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा व अजित बोरा, डॉ. पारस कोठारी व सर्व पदाधिकारी यांनी नवीन कोर्ससाठी शुभेच्छा दिल्या. या सर्वांच्या प्रयत्नांमुळे अभ्यासक्रमास मान्यता मिळाली आहे. सारडा महाविद्यालयात या दोन्ही कोर्ससाठी मोजक्याच जागा शिल्लक आहेत. विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी त्वरित संगणकशास्त्र विभागप्रमुख प्रा. राजेश पाटणी मोबाईल नंबर ९८९०५९१५६५ यांचाशी संपर्क साधावा.

# आयएमएस सीडसीच्या 'राखी स्पेशल वुमन एंटरप्रेन्युअर्स एक्स्पो'चे उद्घाटन

नगर – महिलांच्या उद्योजकीय कौशल्याला व्यासपीठ मिळवून देणे, त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि महिला उद्योजिकांना परस्परांशी जोडणे या उद्देशाने बीपीएचई सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, करिअर डेव्हलपमेंट अँड रिसर्च (आयएमएस सीडीआर) अंतर्गत सीडसीतर्फे आयोजित 'राखी स्पेशल वुमन एंटरप्रेन्युअर्स एक्स्पो २०२६'चे उद्घाटन उत्साहात झाले.



आयएमएस सीडसीच्या 'राखी स्पेशल वुमन एंटरप्रेन्युअर्स एक्स्पो'चे उद्घाटन करताना अरविंद पारगावकर समवेत संस्थेचे पदाधिकारी.

प्रत्येक महिला उद्योजिका ही प्रेरणादायी आहे. आपल्या कल्पकतेला व्यवसायाची जोड देत महिलांनी आत्मविश्वासाने पुढे येणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन उद्घाटक अरविंद पारगावकर यांनी केले. महिलांनी केवळ व्यवसाय सुरू करण्यापुरते मर्यादित न राहता आपल्या उत्पादनांची गुणवत्ता, ब्रँडिंग, मार्केटिंग आणि ग्राहकांशी असलेले संबंध यावरही लक्ष केंद्रित करावे, असे त्यांनी सांगितले.

८ व ९ ऑगस्ट रोजी आम्रपाली मंगल कार्यालय, परिजात चौकाजवळ, अहिल्यानगर येथे या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रदर्शनात महिला उद्योजिकांनी फॅशन, कॉस्मेटिक्स, ज्वेलरी, होम डेकोर, वेस्टर्न आऊटफिट्स, हेल्थ केअर, ब्युटी प्रॉडक्ट्स, मुलांचे कपडे व ॲक्सेसरीज, खाद्यपदार्थ तसेच विविध उत्पादनांचे स्टॉल्स उभारले आहेत. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर विविध आकर्षक वस्तूंची खरेदी करण्याची संधी ग्राहकांना उपलब्ध झाली आहे.

या प्रसंगी संस्थेचे सल्लागार डॉ. एम. बी. मेहता, इनचार्ज संचालक डॉ. प्रणोती तेलोरे, प्रा. गौरी पाटील तसेच आयएमएस सीडसीचे पदाधिकारी, महिला उद्योजिका आणि नागरिक उपस्थित होते.

सीडसीच्या माध्यमातून महिला उद्योजिकांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या या प्रदर्शनाच्या उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन महिला उद्योजिकांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



गुणवंत विद्यार्थ्यांसोबत प्राचार्य डॉ. प्रदीप पाटील व इतर मान्यवर.

# आडसूळ टेक्निकल कॅम्पसच्या सर्वोत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

नगर – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून नुकत्याच घोषित झालेल्या उन्हाळी परीक्षा २०२६ च्या निकालात आडसूळ टेक्निकल कॅम्पसने यंदाही आपल्या सर्वोत्कृष्ट शैक्षणिक निकालाची परंपरा कायम राखत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. अभियांत्रिकी पदवी परीक्षेत महाविद्यालयातून इलेक्ट्रिकल इंजिनियरिंग विभागाची मुलतानी रुकैय्या हकीम (८१.५६%) ही प्रथम तर सिव्हिल इंजिनियरिंग विभागाची आव्हाड प्रियांका प्रकाश (७७.६१%) ही विद्यार्थिनी द्वितीय आली.

विविध विभागांतील अव्वल विद्यार्थी : (बी. ई.) कॉम्प्युटर इंजिनियरिंग: अहिरे धीरज (७१.४४%), कोरडे मानसी (७१.३१%), भागवत कोमल (७०.३४%), इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनियरिंग : सेजल सुरज (७५.९२%), केशर आकांक्षा (७५.३२%), नवघरे स्वाती (७५%). मेकॅनिकल इंजिनियरिंग – स्वामी सिद्धलिंग (७८.९०%), शेख सादिया (७५.६०%), करपे साक्षी (७४.६०%). इलेक्ट्रिकल इंजिनियरिंग मुलतानी रुकैय्या (८१.५६%), म्हस्के वैशाली (७३.६०%), नरवडे श्रीपाद (७३.४०%). सिव्हिल इंजिनियरिंग आव्हाड प्रियांका (७४.२०%), शर्मा कविता (७०.४०%), गायकवाड तेजस (६८.९०%),

विविध विभागांतील अव्वल विद्यार्थी : (एम. ई.) कॉम्प्युटर इंजिनियरिंग: गीतिका पुरोहित (८१.९२%), योगिता सूर्यवंशी (७६.८८%), पालवे प्रियांका (७५.८०%), इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनियरिंग – शिंदे संकेत (७५.%), कोरडे शोभा (७४.९५%), गायकवाड किरण (७४.८०%). मेकॅनिकल इंजिनियरिंग – रोडे राहुल (७४.८६%), कमांडर सचिन रामकिसन (७४.१९%), चेतन झावरे (७४.१९%), चेतन झावरे (७३.२५%). इलेक्ट्रिकल इंजिनियरिंग – निसर्गानं सुदेष्णा धनंजय (७८.६८%), पावले सुनील (७५.०८%), चौधरी महेश (६७.९०%). सिव्हिल इंजिनियरिंग – मगर कोमल अंबादास (७४.४०%), सपिके प्रणव (७२.५०%), ३) पठाण शाहरुख (७२.१०%). एम.बी.ए. अभ्यासक्रमातील प्रथम तीन विद्यार्थी पुढीलप्रमाणे – फणिभरे श्वेता (८०.२४%), गवई महेंद्र (७४%), कारभाल सुरेश (७३.२०%).

विद्यार्थ्यांच्या या यशामुळे आडसूळ टेक्निकल कॅम्पसच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. शेवटच्या वर्षात असतानाच विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी प्राप्त झाल्या आहेत. विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण मेहनत, प्राध्यापकांचे मार्गदर्शन आणि संस्थेने उपलब्ध करून दिलेल्या शैक्षणिक सुविधांचा योग्य उपयोग करून परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. आडसूळ टेक्निकल कॅम्पसची १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखत विद्यार्थ्यांची उज्ज्वल भवितव्याच्या दिशेने वाटचाल सुरू आहे, असे संस्थेचे प्राचार्य व संचालक डॉ. प्रदीप पाटील यांनी नमूद केले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिरुद्ध आडसूळ, सचिव लीना आडसूळ यांनी सर्व विद्यार्थी, शिक्षक, पालकांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# एसटी कर्मचाऱ्यांच्या पेन्शन वाढीसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन

नगर – ईपीएस-९५ योजनेअंतर्गत मिळणारी अत्यल्प पेन्शन वाढवून ती किमान ७,५०० रुपये प्रतिमहिना करण्यात यावी तसेच त्यावर महागाई भत्ता लागू करण्यात यावा, या प्रमुख मागणीसह राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी संघटनेच्या शिष्टमंडळाने राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन निवेदन दिले. ही भेट अकोलेचे आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या पुढाकारातून मुंबई येथे पार पडली.



एसटी कर्मचाऱ्यांच्या पेन्शन वाढीसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन देताना संघटनेचे पदाधिकारी.

या शिष्टमंडळात राज्य संघटनेचे सरचिटणीस सदानंद विचारे, कोषाध्यक्ष गणेश वायफळकर आणि पुणे प्रदेशाचे उपाध्यक्ष बलभीम कुबडे यांचा समावेश होता. यावेळी राज्यभरातील ६५ हजारांहून अधिक निवृत्त कर्मचारी सभासदांच्या व्यथा आणि मागण्या उपमुख्यमंत्री पवार यांच्यासमोर मांडण्यात आल्या.

संघटनेच्या प्रतिनिधींनी सांगितले की, ईपीएस-९५ योजनेअंतर्गत अनेक निवृत्त कर्मचाऱ्यांना आजही अत्यंत तुटपुंजी पेन्शन मिळत आहे. जुन्या निवृत्त कर्मचाऱ्यांना अवघी १,००० रुपये, तर नवीन निवृत्त कर्मचाऱ्यांना ३,००० ते ३,५०० रुपये इतकीच मासिक पेन्शन मिळते. वाढत्या महागाईच्या काळात ही रक्कम अत्यंत अपुरी असून औषधोपचार, वैद्यकीय खर्च आणि दैनंदिन जीवनावश्यक गरजा भागविणेही कठीण झाले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कर्मचाऱ्यांनी त्यांच्या सेवाकाळात दरमहा १,२५० रुपयांची नियमित वर्गणी भरली. योजना सुरू करताना निवृत्तीनंतर पती-पत्नीचा सन्मानाने उदरनिर्वाह होईल, अशी पेन्शन मिळण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात मिळणारी पेन्शन ही अत्यल्प असल्याने हजारो ज्येष्ठ नागरिक आर्थिक अडचणीत जीवन जगत असल्याचे संघटनेने निदर्शनास आणून दिले.

